# आदित्यदीप

वर्ष : ११ / अंक : २ व ३

एप्रिल ते सप्टेंबर २०२०

## स्वप्न जाहले सत्य !



अयोध्येतील राममंदिर भूमिपूजन व शिलान्यास मा. मोदीजींच्या हस्ते संपन्न
५ ऑगस्ट २०२०/श्रावण कृ. द्वितीया शके १९४२

एप्रिल ते सप्टेंबर २०२० शके १९४२

"आपुल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।।"



कार्यकारी संपादक
सौ. अपर्णा अभ्यंकर

# आदित्यदीप

(आदित्य प्रतिष्ठानचे वार्तापत्र)



संस्थापक-संपादक
गुरुदेव शंकर अभ्यंकर

वर्ष : ११ अंक : २ व ३

## अंतरंग


| | |
|---|---|
| अनुक्रमणिका | १ |
| संपादकीय – आदर्श कर्मयोगी – सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर | ३ ते ६ |
| शङ्कर रामायण – महाकाव्य | ७ |
| गुरुदेवांचे हस्तलिखित | ८ |
| बहुतांची अंतरे | ९ ते ११ |
| प्रवचनमाला वृत्तांत | १२ ते १५ |
| मर्यादापुरुषोत्तम श्रीराम – सौ. अपर्णा अभ्यंकर | १६ ते २४ |
| राममंदिर आणि तरुण पिढी – श्री. श्रीकांत आठवले | २५ |
| श्रद्धांजली | २६, २७ |
| माझ्या तरुण मित्रांनो – गुरुदेव | २८ |
| आदित्य प्रतिष्ठान – यू ट्यूब | २९ |
| संतविद्यापीठ प्रगती – क्षणचित्रे | ३०, ३१ |
| पुनश्च कोरोनाग्रस्तांच्या सेवेत ! – श्री. रोहित फडणीस | ३२,३३ |
| शिलान्यास ताम्रपट | ३४ |
| हे पाठ कराच ! | ३५ |


प्रकाशक, मुद्रक, मालक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** (कार्यकारी विश्वस्त - आदित्य प्रतिष्ठान)
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२
संपादक : **सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर** यांनी हे त्रैमासिक
४/१५, वेदान्तनगरी सोसायटी, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२ येथून प्रसिद्ध केले.
REGISTERED : RNI No. MAHMAR / 2010 / 31595



## संपादकीय

# आदर्श कर्मयोगी

– सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर

सस्नेह नमस्कार,

आदित्यदीपचा २०२० जानेवारीचा अंक घेऊन आम्ही तुम्हाला भेटलो होतो. त्यानंतर फेब्रुवारी महिन्यामध्ये गुरुदेवांची अनेक प्रवचने झाली, आणि मग एप्रिलमध्ये येणाऱ्या आपल्या आदित्य प्रतिष्ठानच्या वर्धापनदिनाच्या तयारीला आम्ही लागलो. पण ज्या महाभयंकर रोगाची अर्थात कोरोनाची चाहूल डिसेंबरपासून लागली होती तो शेवटी भारतात आलाच. दि. २२ मार्चपासून आपण सर्वजण बंदिस्त झालो आहोत. ते आता चार महिने झाले तसेच आहोत. त्यामुळे मग पुढचे सर्व कार्यक्रम अनिश्चित कालखण्डापर्यंत पुढे ढकलावे लागले. प्रतिष्ठानचे कार्यालय बंद ठेवण्यात आले. आणि अर्थातच आदित्यदीपचा एप्रिल महिन्यात निघणारा अंक आपण काढू शकलो नाही. प्रतिष्ठानचे कार्यालय कोरोनामुळे गेले चार महिने बंद आहे.

आता एप्रिल व जुलै महिन्यांचा आदित्यदीपचा एकत्रित अंक आपण पाच ऑगस्टला म्हणजे रामजन्मभूमी मंदिराच्या भूमिपूजनानिमित्त प्रकाशित करत आहोत. **तोही इमेल, वॉटस् ॲप द्वारा !** विशेष म्हणजे हा अंक सिद्ध करायला मला माझी सून सौ. आरती हिची अत्यंत मोलाची मदत झाली.

तुम्ही सर्वजण गेली चार महिने आपापल्या घरी विलगीकरण करून बंदिस्त आहात. या कालखंडात अनेकांना वाटलं की गुरुदेवांना भेटावं, त्यांच्याशी बोलावं म्हणून आम्ही एक वेगळा मार्ग निवडला आणि तो म्हणजे आदित्य प्रतिष्ठानचे जे यूट्यूब चॅनेल आहे त्याद्वारा गुरुदेव सर्वांना भेटत राहिले. यामध्ये रामायणातील आशंका, आत्ताच्या काळामध्ये काय करावे, संतांचे विचार असे मार्गदर्शन गुरुदेव करत होते आणि अर्थातच १ जुलैला आषाढी एकादशी आली.

तुम्हाला माहिती आहे की गेली सत्तावीस वर्षे गुरुदेव आषाढी एकादशीला वारकरी कीर्तन संपन्न करतात आणि हजारो श्रोत्यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडतो. कीर्तन तर संपन्न व्हायलाच हवे. मग आम्ही विज्ञानाचा आधार घेतला आणि तुम्हाला सर्वांना माहिती आहे की एक जुलै आषाढी एकादशीला आपण प्रतिष्ठानच्या स्टुडिओमध्ये वारकरी कीर्तन रेकॉर्ड केलं आणि ते यूट्यूबवर प्रसारितही केले. असंख्य लोकांना ते आवडलं आणि एक वेगळीच ऊर्जा सर्वांना मिळाली.


यानंतर गुरुपौर्णिमा आली. त्यानिमित्तही गुरुदेवांनी महर्षी व्यास यांच्यावर प्रवचन केले. तेही लोकांना अतिशय आवडलं. त्यानंतर लोकमान्य टिळक पुण्यतिथी शताब्दी वर्षानिमित्त २३ जुलै आणि १ ऑगस्ट या दोन दिवशी लो. टिळकांचे चरित्र सांगणारे गुरुदेवांच्या प्रवचनाचे कार्यक्रम आपण प्रसारित केले. लोकांच्या प्रतिक्रिया वाचून आम्ही अक्षरशः भारावून गेलो. तेव्हा आता या माध्यमातून आपण भेटायचं असं नक्की केलं आहे. आपणापैकी कोणी जर प्रतिष्ठानचे यूट्यूब चॅनेल पहात नसेल अवश्य पहा. चॅनेलला सबस्क्राइब करा. चॅनेलचे नाव आहे Aditya Pratishthan सबस्क्राइब करणे हे विनामूल्य असते. त्यावर तुम्हाला गुरुदेवांचे उत्तम कार्यक्रम पहायला मिळतील.

या कालखण्डात प्रतिष्ठानचे कार्यालय जरी बंद होते तरी आम्ही जेव्हा काम करायला कार्यालयात येत असू तेव्हा अनेक फोन येत असत. सर्वांना ही

उत्सुकता होती की आता गुरुदेव काय करत आहेत? आणि म्हणून मुद्दाम मी त्यांचा दिनक्रम तुम्हाला सांगते आहे. गुरुदेव गेल्या चार महिन्यात एक **आदर्श कर्मयोग्या**चे जीवन जगले आहेत. सकाळची पूजा आणि नाश्ता झाला की गुरुदेव अकरा ते दोन कार्यालयामध्ये येऊन रामायणाचे लेखन करीत असत आणि प्रतिष्ठानच्या सर्व ग्रंथालयाची पुर्नमांडणी त्यांनी या कालखंडात केली. आमच्या लग्नाचा वाढदिवसाचा एक दिवस वगळला तर मला असं आठवत नाही की गुरुदेव कार्यालयामध्ये लेखनासाठी आले नाहीत. बाहेर जाता येत नाही म्हणून चिडचिड नाही. प्रवचने नाहीत म्हणूनही अस्वस्थता नाही. तर ते शांतपणे त्यांचं कार्य करत राहिले आहेत. रामायणाचे तिसरे काण्ड- अरण्यकाण्ड हे आता त्यांचे लिहून पूर्ण होत आले आहे. मी या अंकामध्ये मुद्दाम त्यांचं हस्तलिखिताचे एक पान तुम्हाला सर्वांना दाखवणार आहे. एकटाकी आणि सुबक लेखन म्हणजे काय याचा तुम्ही सर्वांनी अनुभव घ्यावा. (पृष्ठ ८ पहा)

याशिवाय प्रतिष्ठानच्या स्टुडिओमधेच आम्ही एक छोटं व्यासपीठ तयार केलं आणि त्या छोटाशा जागेत आमचं पहिलं रेकॉर्डिंग झालं कीर्तनाचं. बाहेरून कार्यकर्ते मदतीला येणे शक्यच नव्हते. मग घरची सर्व टीम कामाला लागली. आमच्या सुनांनी उत्साहाने विठ्ठलासाठी घरच्या तुळशीचा व फुलांचा हार तयार केला. छोट्याशा स्टुडिओत स्टेज तयार झाले. अरुंधती आणि तिच्या मदतीला दोन्ही नातवंडे अर्जुन-अद्वैत रेकॉर्डिंगसाठी सज्ज झाले आणि मग विठ्ठलकृपेने रेकॉर्डिंग पार पडले. यानंतर महत्त्वाचा टप्पा होता या पूर्ण कार्यक्रमाचे एडिटिंग करणे. हे अवघड काम डॉ. आदित्य अभ्यंकर यानी परिश्रमपूर्वक पूर्ण केले. पहिले कीर्तनाचे चित्रीकरण पूर्ण झाले. यशस्वी झाले आणि मग वारंवार चित्रीकरण सुरू झाले.

कधी रामायणातील आशंका असतील, कधी




कीर्तन असेल, कधी व्यास पौर्णिमा, कधी लोकमान्य टिळक, कधी झांशीची राणी. या सर्व चित्रीकरणाच्या वेळेस वेळ झाली की गुरुदेव उठून स्टुडिओमध्ये येत असत आणि ते प्रवचन झाले, रेकॉर्ड झाले की पुन्हा जाऊन लिखाण करत बसत असत. मला इतकं नवल वाटायचं! मी त्यांना म्हणायचे, तुम्हाला असं वाटत नाही का की आपण दमलो आहोत. जरा आराम करावा. पण त्यांच्यामधील ही ऊर्जा अतुलनीय आहे. बाहेर जावं असंही त्यांना कधी वाटलं नाही. रामायणात ते इतके रमले की त्यांना बाहेरच्या जगाचा विसर पडला जणू. मग संध्याकाळचा वेळ मात्र ते आमच्याबरोबर घालवतात. आम्ही दररोज संध्याकाळी ॐकार साधना करतो आणि मग त्यानंतर ते कधी मुलांना संतांच्या, शिवाजी महाराज, क्रिकेटच्या गोष्टी सांगतात किंवा आमची वेगवेगळ्या विषयांवर चर्चा होते आणि मग रोज अभंग गायन असा आता नित्य दिनक्रम झाला आहे.

एक अनुभव सांगावासा वाटतो. माणसाला लोकेषणा नेहमी भुरळ घालत असते. गुरुपौर्णिमा आली आणि पंचवीस एक फोन तरी असे आले की गुरुदेव आम्हाला भेटू शकत नाहीत तर गुरुदेवांनी बाहेर येऊन आम्हाला दर्शन द्यावे. आम्ही तुमच्या घरा बाहेर येऊन थांबतो. मी गुरुदेवांना लगेच विचारले की काय उत्तर द्यायचं? त्यांनी तेव्हा

निक्षून नाही असेच सांगितले. मी म्हणलं की काय हरकत आहे? ते बाहेर येऊन थांबणार आणि तुम्हाला नमस्कार करून लगेच निघून जाणार. त्यांची खूप इच्छा आहे. परंतु गुरुदेव म्हणाले की मी जरी घरात असलो तरी ते लोक बाहेरून सर्वांच्या संपर्कात येणार आणि आत्ताच्या कालखंडामध्ये त्यांनी असे बाहेर येणे योग्य नाही. तेव्हा निक्षून त्यांना नाही असेच सांग. याला म्हणतात लोकेषणेवर विजय.

अर्थात या कालखंडात वैश्विक संत विद्यापीठाचे विचार अहोरात्र मनामध्ये होतेच. आपण तेथे जवळजवळ दोन एकरात मंदिराच्या पाया भरण्याचे काम सुरू केले आहे. कोरोना सुरू झाल्यावर तेथे ३५ कामगार अडकून राहिले होते. त्यांची योग्य ती काळजी घेण्यात आली. आणि परवानगी मिळाल्यावर दोन महिन्यांनी ते त्यांच्या गावी गेले. कारण त्या कालखंडात बांधकामाला पूर्णत: स्थगिती द्यावी असे सरकारचे आदेश होते.

त्याच बरोबर तेथे देवळे आणि औंढोली अशा दोन्ही गावांमध्ये अत्यंत गरजू लोकांना प्रतिष्ठानच्या-वतीने आपण अन्नधान्य आणि गरजेच्या वस्तू यांचे एक किट तयार करून अशा पाचशे थैल्या लोकांना वाटल्या.

त्याच बरोबर संतभारतीच्या दर्शनी भागातील मोठी देखणी भिंत बांधून पूर्ण करण्यात आली. गेट





बसविण्यात आले. आता तुम्ही जेव्हा पुणे-मुंबई हायवेवरून जाल-याल तेव्हा ही अवश्य बघू शकता.

त्यानंतर झालेल्या निसर्ग या चक्रीवादळामध्ये आपल्या जागेशेजारी असलेले मोठे होर्डिंग खाली पडले. आपल्या वॉचमनचे घर जवळच होते. तरी त्याला सुदैवाने काहीही इजा झाली नाही. ईश्वरच रक्षणकर्ता असतो हेच खरे. परंतु त्यामुळे झालेल्या पडझडीची दुरुस्ती करणे आवश्यक होते. या सर्व कामांसाठी गुरुदेव रोज सकाळी तेथील व्यवस्थापकां-बरोबर सतत संपर्कात असत आणि सर्व कामे व्यवस्थित पार पडली. आपण बांधकाम पुन्हा सुरू करणार आहोत.

कोरोनामुळे आपल्या देशात ज्या व्यक्तींचे मृत्यू झाले त्यासाठी अत्यंत दु:ख होत आहे. परंतु ही वैश्विक महामारी आहे आणि मोदींच्या नेतृत्वाखाली आपण त्याला तोंड द्यायचे आहे, हे निश्चित. वाईटातून चांगले कसे असते हे आपण चीनच्या बॉर्डरवर पाहिले. आपला देश आता सीमेवर अतिशय सामर्थ्यशाली बनला आहे याचा खूप आनंद मनामध्ये आहे.

**दुसरी अत्यंत आनंदाची बातमी म्हणजे ५ ऑगस्टला राम मंदिराचे अयोध्येमध्ये भूमिपूजन होते आहे. हिंदू मनाला यापरता आनंद तो कोणता वाटणार? गुरुदेवही या बातमीने अत्यंत सुखावले आहेत.**

खरे तर १९८६ साली संघाने सर्वप्रथम राम मंदिराचा प्रश्न उचलून धरला. विश्व हिंदू परिषदेने तो विस्तारला. त्यानंतर १९९० पासून विटा अयोध्येपर्यंत नेण्याची मोठी मोहीम सुरू झाली.

दि. ६ डिसेंबर ला बाबरी ढाचा पाडला. त्याआधी पूर्ण भारतात मोठे जनजागरण सुरू होते. अभ्यंकरांवर गोव्यामध्ये प्रवचने करण्याची जबाबदारी संघाने व विहीपने सोपवली होती. मला आठवतय की शांतादुर्गा मंदिरात मुक्काम करून १५ दिवसात २० तरी मोठी व्याख्याने गुरुदेवांनी दिली होती. खूप भारलेला कालखण्ड होता तो. म्हापसा येथील सभा तर 'न भूतो न भविष्यति' अशी झाली. त्यामुळे ५ ऑगस्टला राम मंदिराचा सोहळा पाहताना ऊर भरून येईल हे नक्की. सध्याच्या गलिच्छ तत्त्वहीन राजकारणात हा मोठा आनंदाचाच क्षण असेल!

मंदिर, त्याचं भूमिपूजन हा जनमताच्या कौलाचा उत्सव आहे आणि हे भूमिपूजन आदरणीय पंतप्रधान नरेन्द्र मोदीजी यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. ज्यांनी गेली ७० वर्षे हे मंदिर नाकारण्याचा आणि लोकांना दुखावण्याचा प्रयत्न केला त्यांना हे उत्तर आहे. मोदींच्या हस्ते या मंदिर ट्रस्टने भूमिपूजन ठरवले हे यासाठीच. हे सर्व भारतीय संविधानानुसार घडते आहे. कारण सुप्रीम कोर्ट हे संविधानानुसार स्थापन झाले. संसद संविधानानुसार स्थापन झाली. हा रामजन्मभूमीचा खटला दीर्घकाळ चालला तो संविधानानुसार स्थापन झालेल्या कोर्टामध्येच. त्यामुळे हे सगळे राज्यघटनेनुसारच घडते आहे. आता भारतीय आणि भारताबाहेरील हिंदूंना न्याय मिळणार आहे हे मागच्या काही पिढ्यांनी केलेल्या संघर्षाचे मधुर फळ आहे. अर्थात् त्यासाठी पंतप्रधान तेवढे सक्षम लागतात. ते मा. मोदींच्या रूपाने मिळाले हे आपले भाग्य.

या मंदिराच्या पायाभरणीसाठी ठिकठिकाणाहून माती पाठवली जात आहे. तशी ती सज्जनगडाहून पण जाते आहे. समर्थ रामदास म्हणत असतील-

'दास म्हणे आम्ही केले पावलो ।<br>
दयेसी नाही सरी ।<br>
कल्याण करी रामराया ॥'

गुरुदेव 'शङ्कर रामायण' लिहीत असताना असा प्रसाद मिळाला याचा विशेष आनंद मनामध्ये आहे. आपणही सर्वांनी शंकर रामायण अवश्य वाचा. एक मोठा सात्विक आनंद तुमच्या मनामध्ये उमलेल. वाल्मीकि रामायणावरील ही जरी ओवीबद्ध टीका असली तरी अत्यंत सोप्या आणि सुलभ भाषेत आणि प्रासादिक भाषेत गुरुदेवांनी ती रचली आहे. त्यामुळे प्रत्येक मराठी माणसाला त्याचा आनंद घेता येतो. या लॉकडाउनच्या कालखंडात अनेक ज्येष्ठांनी त्याचे घरी पुन्हा पुन्हा वाचन केले आहे आणि त्याचा आनंद घेतला आहे. आपणही सर्वांनी तो अवश्यमेव घ्यावा अशी मी तुम्हाला विनंती करेन.

आता लवकरच आपण अरण्यकांडाच्या प्रकाशनाला भेटू याचा मला विश्वास वाटतो. किंबहुना परमेश्वराजवळ आपण तशी प्रार्थना करूया.


या कालखंडात प्रतिष्ठानच्या अत्यंत निष्ठावंत चार कार्यकर्त्यांचे आणि हितचिंतकांचे निधन झाले. त्याचेही आत्यंतिक दु:ख मनामध्ये आहे. त्यांच्या आत्म्याला ईश्वर सद्गती देवो ही प्रार्थना करते.

शेवटी असा विचार मनामध्ये येतो की आपल्याला सदैव संत, आचार्य सांगतात की मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे आणि त्याचा आत्मउन्नती होण्यासाठी जास्तीत जास्त उपयोग करून घ्या. आता या महामारीच्या कालखंडात आपण सर्वांनीच तो अनुभव घेतला आहे. परंतु अशा कालखंडामध्ये खचून न जाता, न चिडता, न रागावता उत्तम कर्मयोग कसा करावा याचे उदाहरण गुरुदेवांनी आपल्याला घालून दिले आहे. आपणा सर्वांना ज्ञात व्हावे म्हणून मी या संपादकीयमध्ये त्याचा उल्लेख केला आहे. आपण सर्वजण आदित्य प्रतिष्ठानचे कार्य पूर्ण होण्यासाठी कटिबद्ध होऊ या हीच विनंती पुन्हा एकदा करते आणि विरमते.

* * *


# ‘शङ्कर रामायण’ महाकाव्य

**‘रामायण थोर वारसा । धर्म संस्कृतीचा आरसा ।
हिन्दु बांधवांनो, हा वसा । जपू या सारे ।।’**




११,२३४ ओव्या

(पृष्ठ संख्या–बत्तीस + ६२४)




१५९७२ ओव्या

(पृष्ठ संख्या– बहात्तर + ८८४)

**मोहोरेदार कागद, उत्कृष्ट छपाई!**

**रामचरित्रातील उत्कट प्रसंगाची रंगीत चित्रे!**

महर्षि वाल्मीकींच्या रामायणावर गुरुदेव शंकर अभ्यंकर लिखित मराठी भाषेतील ओवीबद्ध रसाळ टीका असणारे ‘शङ्कर रामायणा’चे ‘बालकाण्ड’ आणि ‘अयोध्याकाण्ड’ प्रकाशित झाले असून, ‘अरण्यकाण्ड’ दिवाळीच्या सुमारास प्रकाशित होईल.

सहज सोपी रसाळ भाषा, प्रवाही ओव्या, एक टाकी लेखन, आनुषंगिक अनेक कथा व विषयांचा विस्तार, विवेचक प्रस्तावना ही या ग्रंथाची अनेकविध वैशिष्ट्ये आहेत. महाराष्ट्रात व परदेशातही अनेक ठिकाणी या ग्रंथाची पारायणे होत आहेत.


रु. १०००/- देऊन पृष्ठदान केल्यास ‘अरण्यकाण्ड’ हा ग्रंथ सानंद भेट मिळेल.

आपली देणगी ‘आदित्य प्रतिष्ठान’ या नावे पाठवावी.

HDFC Bank : A/c no. 08251110000016 IFSC : HDFC0000825

ऑनलाइन पैसे पाठवल्यास कृपया ८४८४९२११३० या प्रतिष्ठानच्या मोबाईल नंबरवर कळवावे.

## ‘शंकर रामायणा’ मधील गुरुदेवांचे हस्ताक्षर –



शङ्कर रामायण ७९

अरण्यकाण्ड - सर्ग अकरावा

श्रद्धायुक्त सन्ध्योपासन । कर्मनिष्ठा ती दैनंदिन ।
करिती विनम्र वंदन । मुनिचरणा ॥२५६॥
होऊनि आताश्री प्रसन्न । अर्पिती मधुर फलान्न ।
राघव, सीता नि लक्ष्मण । सन्मानिती ॥२५७॥
सत्कारिती ते रघुकुला । साधुनिया प्रसन्न वेळा ।
तपश्चर्या श्रेष्ठ अतुला । महर्षींची ॥२५८॥
करिती शुद्ध आश्रमात । यामिनीस एका व्यतीत ।
रघुनन्दन, सीता श्रांत । लक्ष्मणासह ॥२५९॥
जैसा सूर्य उदयाचली । सुविभूति हो महाबली ।
[illegible] स्थळी । आश्रमाते ॥२६०॥
वंदिती मुनींचे चरण । चरणरज माथी लावून ।
घेता निरोप ते कृतज्ञ । रामसीता ॥२६१॥
म्हणती, ‘घ्यावा प्रणिपात । प्रभो आपण पुण्यवंत ।
केली रात्र येथे व्यतीत । सौख्यदायी ॥२६२॥
आता जाणे आस अंतरी । मुनि-दर्शन घेण्यास वरी ।
श्रेष्ठतम जे युगांतरी । मुनि अगस्त्य ॥२६३॥
म्हणुनी द्यावी अम्हां आज्ञा । भेटण्यासी श्रेष्ठ वेदज्ञा ।
शब्द त्यांचे आशीर्वचना । माझ्यावरी’ ॥२६४॥
निरोप देता महामुनी । पाऊले ती दण्डकवनी ।
उमटली आर्य काननी । संस्कृतीची ॥२६५॥
सुतीक्ष्णे दाविल्या मार्गी । तैसा महावृक्ष प्रवर्गी ।
लता-वेलींचे बहु वर्ग । प्रमोददायी ॥२६६॥
जलकदम्ब नि फणस । साल, अशोक नि शिंशिपा ।
महुआ, बेल, तेंदु रास । चिरबिल्व ॥२६७॥
किती वृक्ष, किती प्रकार । किती वेली, किती [illegible] ।
रानझाडे बहु साकार । असंख्यफळ ॥२६८॥
फुटा बहुरंगी सुगंधी । कुसुमे लावण्य संपदी ।
मुचकुन्द, चम्पक आदी । दाटी होय ॥२६९॥
वेली आलिंगिती वृक्षांस । शोभायमान जे विशेष ।
घनदाट तरी मोदास । मना देती ॥२७०॥

# बहुतांचि अंतरे

***(यूट्यूबवर गुरुदेवांची प्रवचने झाल्यावर अत्यंत बोलक्या अशा प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोहोचल्या. त्यातील काही निवडक आपल्यासाठी)***

Namaskar,

This is a feast for all of us to listen to Lokmanya's Charitra from Gurudev's adbhut Vani. I have been asking my 10 year old son and other children to listen to all episodes of Gurudeo. I completely agree that what we hear from Gurudeo must be taught in every school. Thanks to technology that we are able to listen to this modern sant. Would eagerly wait for Uttarardha.

**- Siddharth Sinkar**

गुरुदेवांना साष्टांग नमस्कार,

संत नामदेव पुण्यतिथी २०२० प्रवचन गोड, मधुर, रसाळ ऐकून मन प्रसन्न झाले.

**- विभावरी खोत**

नमस्कार गुरुदेव

खूप धन्य वाटले. डोळ्यातून अश्रूंच्या धारा थांबत नव्हत्या. आपला कृपाशीर्वाद असावा.

**— प्रभूदास चव्हाण**

**रामायणातील दन्तकथा**

लक्ष्मणरेषा म्हणजेच सदाचार, नीतिमत्तेची मर्यादा हा गुरुदेवांनी सांगितलेला अर्थ प्रत्येकाने धारण करायलापाहिजे. गुरुदेव आपल्या कथनामुळे श्रीरामांच्या पुरुषार्थाचे दर्शन थक्क करते.

**- सुलभा आठवले**

**गुरुपौर्णिमा**

गुरुदेव नमस्कार,

तुम्ही आज जे व्यासांविषयी सांगितले त्याची प्रचिती तुमच्या व्यक्तिमत्त्वात येते. कोणीही शंका घेऊ शकणार नाही की व्यासांनी इतके मोठे कार्य केले किंवा हे शक्य आहे का एक व्यक्तीस? का नाही, या कलियुगात, या आमच्या महाराष्ट्रात, आमच्या पुण्यनगरीमध्ये तुमच्यासारखे व्यास आम्ही पाहतो आहोत. आम्हांस तुमच्या शुद्ध मधुरवाणीतून शुद्ध ज्ञान लाभते आहे. तुम्ही तुमच्या ज्ञानाचा आणि ज्ञानदानाचा व्यास इतका प्रचंड वृद्धिंगत केला आहे, सर्व सामान्य व्यक्तींना त्याचा लाभ करून दिला. **तुमचे वाल्मीकि रामायण अतिशय आवडते, ते यूट्यूबवर उपलब्ध आहे. तुमची निरुपणे, कीर्तने आणि प्रवचन तुमच्याच चॅनेलवर एकाच ठिकाणी उपलब्ध झाली तर श्रवण भक्ती जास्त सोयीची होईल असे वाटते.** आषाढीचे कीर्तनसुद्धा अप्रतिम. लिहिण्यात काही कमी-जास्त असल्यास क्षमा असावी. आपल्या चरणांशी माझा नमस्कार.

**— नम्रता औंधक**

**(नमस्कार, आदित्य प्रतिष्ठानच्या अधिकृत चॅनेलवर ही सर्व प्रवचने उपलब्ध करून देण्याचे काम शीघ्रगतीने सुरू आहे. धन्यवाद! —संपादिका)**

**स्तोत्रगायन**

‘कालभैरवाष्टकम् ज्ञानमुक्तिसाधनं विचित्रपुण्यवर्धनम’ संस्कृतभाषेला देवभाषा का म्हणायचं हा प्रश्न पडत असेल तर आदि शंकराचार्यांची स्तोत्रे हे त्याचं संक्षिप्त तरीही संपूर्ण उत्तर आहे. गुरुदेवांचा स्वर रचने इतकाच आनंद देऊन जातो. स्वरांच्या बरोबरीने पद्य वाचायला मिळाल्याने आम्हालाही म्हणता येते, त्याबद्दल विशेष धन्यवाद!

**- मुग्धा बापट**

आ.गुरुदेवांनी म्हटलेले स्तोत्र ऐकले. ऐकायला खूप छान, गोड व प्रसन्न वाटले. आपण खूप भाग्यवान आहोत लॉकडाऊन काळात आपणास सतत काहीतरी चांगले ऐकायला मिळते.

मा. गुरुदेव, ऐकून भारावून गेलो. शब्दच नाहीत बोलायला नि:शब्द रे मना... अशी अवस्था ऐकून आत्ता झाली आहे. आवाज गंभीर छानच!

**– नरेन्द्र खोत**

**गुरुपौर्णिमा**

पूजनीय गुरुदेवांना साष्टांग नमस्कार.

आजच्या गुरुबोधातील अमूल्य ठेवा म्हणजे, ''आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व्यास हा व्यासचर्येने वाढवत न्यायचा असतो'' हे गुरुवाक्य होय. महर्षि व्यासांची व्याप्ति समजायला हा जन्म अपुरा पडेल पण गुरुबोधातील रत्ने वेचून हा जन्म नक्कीच सार्थकी लागेल.

**– प्राजक्ता जोशी**

**वारकरी कीर्तन २०२०**

दरवर्षीप्रमाणे याही वेळी अमृतानुभव दिल्याबद्दल गुरुदेव, जितेंद्रदादा आणि डॉ. आदित्य सर यांना मन:पूर्वक धन्यवाद. गुरुदेवांना मनपूर्वक नमस्कार, काकूंना नमस्कार.

**– तुषार जाधव**

गुरुकृपा झाली. भक्तिरसाचा मेघ बरसला. पांडुरंग अनेक मैलांवरून ही घरीच भेटला.

**– अनुराधा तळपदे (ऑस्ट्रेलिया)**

नमस्कार गुरुदेव,

गुरुदेवांचा गाढा अभ्यास, दाखले, त्यांची गेयता, रागांचा अभ्यास, स्पष्टवक्तेपणा आणि तरुणांना लाजवेल अशी एनर्जी खूपच छान. गेले ४ वर्षे ऐकते आहे. पहाते आहे मला ते नेहमीच आवडले आहे.

**– सुषमा करंदीकर**

गुरुदेवांचे चरणी नतमस्तक.

करोना महामारीचे पार्श्वभूमीवर आजच्या परिस्थितीला शांतपणे सामोरे जाऊन आत्मबल वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त कीर्तन.

**– उमेश कुलकर्णी**

**रामायणातील दन्तकथा**

नमस्कार, मी गुरुदेवांचे सर्व विडिओ ऐकले आहेत. गुरुदेवांनी वाल्मीकि रामायणवर केलेले आख्यान तर ३ वेळा संपूर्ण ऐकले आहे. गुरुदेवांचे कार्य खूप मोठे आहे आणि त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

**– सोमनाथ सोनवणे**

**रामायणातील आशंका**

प्रमाण गुरुदेव.

तुमच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. धन्य झालो मी. शंकर अभ्यंकरांना पाहिले त्यांचे विचार-आचार, सदाचार ऐकायला मिळाले, वाचायला मिळाले.

**– प्रकाश माने**

शंकर अभ्यंकर यांच्यासारखा माणूस पुन्हा होणार नाही. ब्रह्मदेवाला पडलेले एक स्वप्न आहे. जे एकदाच सत्यात उतरले.

**– नीलिमा लिमये**

**विवेकानंद प्रवचनमाला**

अतिशय रसाळ वाणीतून सुंदर प्रवचन पुन:पुन्हा ऐकतच रहावे असे.

**– अपर्णा देव**

**लोकमान्य टिळक चरित्र -**

आदरणीय गुरुदेव आणि सौ. वहिनी,

सादर नमस्कार,

ज्ञानमूलक, भक्तीचे हृदय असलेल्या निष्काम कर्मयोगी लो. टिळकांचे चरित्राला समांतर उदाहरण शोधणे कठीणच! नीती, सदाचार संपन्न, उत्तम वक्ता, उत्तम संपादक, गुणग्राहक, स्थितप्रज्ञ, अलौकिक बुद्धिमत्ता धारक आणि स्वदेश, स्वातंत्र्य, स्वधर्म, भारतीय संस्कृती यावर असामान्य निष्ठा आणि प्रेम

असलेल्या टिळकांनी स्वातंत्र्य लढ्यात टिळक युग निर्माण केले. त्या तेजस्वी चरित्राची ओळख करून देण्यास आपल्यासारखेच व्यक्तिमत्त्व हवे. भारतीय अस्मिता आणि राष्ट्रगौरव वाढवणारे लोकमान्य चरित्र भारतीयांनी पिढ्यानपिढ्या गावे असेच आहे. आपण गायलेले हे टिळक चरित्र कथन आजच्या तरुण पिढीला नेहमीच प्रेरणा देईल.

**– सौ. सुलभा आठवले**

आदरणीय गुरुदेव आणि सौ. वहिनी

सादर नमस्कार,

भारतीय संस्कृती नररत्नांची खाण आहे. अशा नररत्नांची जयंती-पुण्यतिथी साजरी करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. पण या दिवशी अशा थोर चरित्रांचे केवळ स्मरण न करता त्यांचे कार्य त्या त्या दिवशी समजून घेणे असा योग केवळ अपूर्व! २३ जुलै आणि १ ऑगस्ट या दोन दिवशी विशुद्ध चारित्र्याच्या आणि जाज्वल्य देशभक्ती धारण करणाऱ्या लोकमान्यांचे चरित्र गुरुदेवांच्या विशुद्ध वाणीतून ऐकून आम्ही सारेच भरून पावलो.

इतिहासाचा अभ्यास कसा करावा आणि इतिहास कसा शिकवावा या दोन्हीची वस्तुपाठ म्हणजे आपले प्रवचन.

लोकमान्य चरित्रातील २ औंस दुधाचा उल्लेख, तीर्थोदक- अग्नीशी त्यांची तुलना, सौ. सत्यभामाबाआंचे पातिव्रत्य, लोकमान्यांचे पुत्रविरहाचे दु:ख अशा प्रसंगांच्या वर्णनाने डोळे भरून येत होते.

गीतारहस्य ग्रंथांचा आपण थोडक्यात घेतलेला आवाढा अत्यंत मार्गदर्शक. लोकमान्यांच्या इतर दोन ग्रंथांवर आपण असे भाष्य प्रवचनाच्या माध्यमातून केल्यास ते ग्रंथ वाचण्यासाठी मार्गदर्शन आणि प्रेरणा पुढच्या पिढीला मिळेल असे मनापासून वाटते.

प्रवचनात उल्लेख होणाऱ्या महनीय व्यक्तींचे आणि कागदपत्रांचे वेळोवेळी दाखवलेले फोटो त्या त्या प्रसंगाची उत्कटता वाढवत होते. या संकलनासाठी डॉ. आदित्य यांचे अभिनंदन.

अशी चरित्रे सांगताना समाज घडवणे हे आपले तत्त्व प्रकर्षाने जाणवते. १९९८ मध्ये झालेली लोकमान्यांवरील प्रवचनमाला आणि आत्ताची ही दोन प्रवचने ही सुद्धा त्या तत्त्वाला धरूनच झाली. तत्त्वाशी तडजोड न करता स्वत्व राखणे हा लोकमान्यांचा जो गुण आपण सांगता तोच आपणही स्वत:त रुजवला आहे हे क्षणोक्षणी जाणवते आणि मन अभिमानाने भरून येते.

आदि शंकराचार्यांच्या 'लोकस्य उन्मार्ग प्रवृत्ति निवारणं लोकसङ्ग्रह:।' या उक्तीनुसार आपण लोकशिक्षण-संस्कृती सवर्धनाचे काम करीत आहात निश्चित.

लोकमान्यांच्या निर्वाणाचा प्रसंग ऐकताना शंभर वर्षापूर्वी जनमानसातून अश्रूंचा पूर कसा वाहिलाअसेल याचा अनुभव आम्ही घेतला. अत्यंत श्रद्धापूर्वक लोकमान्यांच्या स्मृतीला वंदन! राष्ट्रीय हित मनात ठेवून प्रत्येक कृती करणं आणि कोणतीही तडजोड न करता स्वत्व राखणं अशी प्रेरणा आम्ही घेत आहोत.

**– आदित्यव्रती**
**सौ. रश्मी तुळजापूरकर**

लोकमान्य टिळक पुण्यतिथी

लोकमान्यांसारख्या उत्तुंग व्यक्तीमत्व आणि चारित्र्यवान महापुरुषाची आयुष्य गाथा यावर प्रगाढ प्रसंगायोचित अभ्यास करून उदात्त भावनेने केलेले विवेचन या राष्ट्र पुरुषासाठी खरी आदरांजली आहे. आणि हे बोधपर, प्रेरणादायी आपले सुश्राव्य शब्दांकन ऐकून मीही धन्य झालो.

**– मे. एल. एम. टुल्स**

जे लोकमान्यांचे चरित्र शाळेत शिकायला मिळाले नाही ते आज कळले. नव्या पिढीला हे कळले पाहिजे.

**– सुभाष शेठ**

(असे अनेक अभिप्राय आले आहेत. हे प्रातिनिधिक दिले आहेत. सर्वांना खूप धन्यवाद!)

* * *

# प्रवचनमाला वृत्तांत

## दि. ३ जानेवारी २०२०
## बेडेकर गणपती मंदिर, पुणे



कोथरूड ज्येष्ठ नागरिक सांस्कृतिक मंडळातर्फे डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे 'प्रतापगडचे युद्ध' या विषयावर बेडेकर गणपती मंदिरात व्याख्यान झाले. महाराजांचे युद्धतंत्र, आधीची तयारी, पूर्व इतिहास हे सर्व २ तासामध्ये त्यांनी अप्रतिम उलगडले. श्रोते मंत्रमुग्ध झाले. आदित्य प्रतिष्ठानचे प्रतिनिधित्व करून दिलेले हे त्यांचे पहिलेच व्याख्यान सर्वांना अतिशय आवडले. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते डॉ. रबडेकाका यांनी या व्याख्यानाचे संयोजन केले.

## दि. ८ ते १२ जानेवारी २०२०
## श्रीराम कथा, मुलुंड



धर्मजागरण मंडळ, मुलुंड या संस्थेच्या आग्रहामुळे गुरुदेवांची रामायणावरील प्रवचने पौष शुद्ध त्रयोदशी ते पौष वद्य तृतीया या काळात मुलुंडमध्ये गवाणपाडा येथे पटांगणामध्ये श्रीरामकथा संपन्न झाली. अनेक वर्षांनी मुलुंडमध्ये प्रवचनमाला होत असल्याने श्रोत्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला.



श्रीरामांचे सद्गुण, त्यांची पितृभक्ती, पराक्रम, साहस, नीतिमत्ता हे सर्व गुण रामकथा जशी पुढे पुढे गेली तसे अधिकाधिक प्रकट होत गेले. खुलत गेले. वैश्विक संत भारतीची संकल्पनाही श्रोत्यांना भावली. ग्रंथ, पेनड्राइव्हज् याची उत्तम विक्री झाली. आत्ताच्या कालखण्डात त्याचा उत्तम उपयोग श्रोत्यांना झाला असेल.

## दि. २० जानेवारी २०२०
## लोकमान्य टिळक प्रवचन, डेरवण



गुरुदेवांचे आणि सहस्त्रबुद्धे समाधी मंदिराचे प. पू. काकामहाराज यांचा गेल्या अनेक वर्षांचा दृढ

स्नेह आहे आणि गुरुदेव तेथे कार्यक्रमासाठी नित्य जात असतात. परंतु यावर्षी गुरुदेव जाऊ शकत नव्हते. तेव्हा गुरुदेवांऐवजी त्यांचे चिरंजीव डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी 'लोकमान्य टिळक' या विषयावर डेरवण येथे व्याख्यान दिले. अतिशय ओघवती भाषा, उत्तम व्यासंग, प्रभावी कथन यामुळे श्रोते आणि स्वत: प. पू. काका महाराजही अतिशय आनंदित झाले.

### दि. २३ जानेवारी २०२०
### टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

'गीतारहस्य'यावर इंटरनॅशनल कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती. त्यामधे २३ जानेवारीला डॉ. आदित्य अभ्यंकर यांचे व्याख्यान झाले. पहिला एक तास गीतारहस्यावर इंग्रजीमधून उत्तम भाषण आणि त्यानंतर दीड तास प्रश्नोत्तराचा तास – अभ्यासक श्रोते भारावून गेले. स्वत: मा. दीपकजी टिळकांचा गुरुदेवांना डॉ. आदित्य अभ्यंकरांचे कौतुक करणारा दूरभाष आला. अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असा हा सहभाग ठरला.

### दि. १५, १६ फेब्रुवारी २०२०
### संत ज्ञानेश्वर चरित्र, जळगाव



जळगावमध्ये जवळजवळ २५ वर्षांनी गुरुदेवांची प्रवचने संपन्न झाली. जळगाव जनता सहकारी बँके या प्रवचनमालेचे उत्तम संयोजन केले. बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी जणू हा सोहळा संपन्न करण्यासाठी मग्न होते. छत्रपती संभाजी महाराज नाट्यगृह या रंगमंदिरात 'संत ज्ञानेश्वर माउली' या विषयावर प्रवचने संपन्न झाली.



गुरुदेवांचे प्रवचन सुरू झाले की अक्षरश: नि:शब्द शांतता होई आणि श्रोते प्रवचनात तल्लीन होत. संत ज्ञानेश्वरांचे अद्‌भुत चरित्र, त्यांची शब्दकळा, ज्ञानेश्वरी, तत्त्वज्ञान, समाधीसोहळा हे गुरुदेवांनी अप्रतिम उलगडून दाखवले. आत जेवढे श्रोते तेवढेच बाहेरही असत.

### दि. २२ मे २०२०
### राणी लक्ष्मीबाई



जगद्विख्यात हृदयशल्य विशारद डॉ. कै. नितू मांडके यांचा सतरावा स्मृतिदिन डॉ. अलकाताई मांडके यांनी संपन्न केला. पण तो वेबच्या माध्यमातून. यामध्ये गुरुदेवांचे 'राणी लक्ष्मीबाई' या विषयावर अत्युत्कृष्ट भाषण संपन्न झाले. अजूनही आपण 'Nitu Mandke Memorial' या यूट्यूब चॅनेलवर हे भाषण ऐकू शकता. हा कार्यक्रम पूर्वनियोजित

होता. पण कोरोनामुळे तो थिएटरमध्ये होऊ शकला नाही. पण अलकाताई मांडकेंच्या प्रयत्नामुळे तो त्याच तारखेला यूट्यूबवर प्रसारित झाला हे विशेष. अर्थात् तो ५००० च्या वर प्रेक्षकांनी एकत्र पाहिला आणि खूप छान प्रतिसाद मिळाला.

### दि. ३ जून २०२०
### लोकमत आयोजित ज्ञानसत्र

या गोंधळलेल्या जगात जीवनाचा अर्थ आणि हेतू शोधणे आव्हानात्मक आहे पण अध्यात्मिक सामर्थ्य या संकटावर मात करायला मदत करते आणि गुरूच त्यातून सोपा मार्ग दाखवतात. **'विद्वान आध्यात्मिक गुरुसह ज्ञानसत्र'** या लोकमत आयोजित वेबिनार कार्यक्रमात सूत्रसंचलन करणाऱ्या प्राजक्ता माळीच्या प्रश्नांना गुरुदेवांनी उत्तरे दिली. आणि कोरोनामुळे नैराश्य आलेल्या अनेक श्रोत्यांना जणू नवसंजीवन प्राप्त झाले. वेबवरून प्रसारित झालेल्या या कार्यक्रमाला प्रचंड व्ह्यूअरशिप लाभली.

### आषाढी एकादशी – वारकरी कीर्तन
### दि. १ जुलै २०२०




प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी कीर्तन संपन्न झाले पण तेही यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून. 'चित्ती असो द्यावे समाधान' हा संत तुकारामांचा अभंग गुरुदेवांनी कीर्तनासाठी निवडला. आणि कोरोनाच्या कालखण्डात कसे राहावे याचे उत्तम उद्बोधन केले. सीए श्री. जितेन्द्र अभ्यंकर व डॉ. आदित्य अभ्यंकर यांची उत्कृष्ट गायन साथ या कीर्तनात लाभली. सीए जितेन्द्र अभ्यंकर यांनी 'चित्ता ऐसी नको देऊ आठवण' हा अभंग राग गुणकली मध्ये गायला आणि डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी कलावती रागामधील 'मन रामी रंगले' हा अभंग गायला. त्याच बरोबर यावर्षी प्रेक्षागृहामधे हा कार्यक्रम करता येत नसल्यामुळे सर्व टाळकरी, वादक, श्रोते यांना वाटणारी भावना श्री. जितेन्द्र अभ्यंकरांनी एक अप्रतिम काव्यरचना करुन व्यक्त केली. ती जितेन्द्र व आदित्य या दोघांनी मिळून गायली. यूट्यूबवर आपण हा कार्यक्रम अवश्य पहावा. भक्तिरसाचा विलक्षण अनुभव आपल्याला या कीर्तनातून मिळतो. हा कार्यक्रम आत्तापर्यंत १० हजारहून अधिक लोकांनी ऐकला आहे.

### दि. ४ जुलै २०२०

व्यासपौर्णिमेच्या निमित्ताने महर्षी न्यायरत्न विनोद यांच्या साधनासूत्रांचे संकलन केलेला 'साधनासूत्रे- एक महाजागर' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. त्याला गुरुदेवांनी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे. महर्षी विनोदांच्या कन्या अदिती वैद्य यांनी हे प्रकाशन गुरुदेवांच्या हस्ते करायचे पूर्वीच ठरवले होते. कोरोनामुळे ते शक्य न झाल्याने यूट्यूबच्या माध्यमातून हा कार्यक्रम संपन्न झाला.

### दि. ५ जुलै २०२०



गुरुपौर्णिमा 'महर्षी व्यास' या विषयावर गुरुदेवांनी यूट्यूबच्या माध्यमातून प्रवचन केले. व्यासांचा अद्भुत जन्म, व्यासचर्या म्हणजे व्यासांचे वाङ्मय, महाभारताची व पुराणांची रचना हे ऐकताना श्रोते स्तिमित होऊन गेले. याला आजपर्यंत १९ हजार श्रोत्यांनी ऐकले.

### दि. १८ जुलै २०२०




संत नामदेव महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त गुरुदेवांनी यूट्यूबवर केलेल्या प्रवचनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. नामदेवांचे कर्तृत्व एवढे मोठे आहे याची कल्पनाच नव्हती असे श्रोत्यांनी आवर्जून सांगितले. ५००० हजार श्रोत्यांनी हा कार्यक्रम आतापर्यंत पाहिला.

### दि. २३ जुलै व १ ऑगस्ट २०२०



टिळक पुण्यतिथी शताब्दी वर्षानिमित्त टिळकांचे चरित्र गुरुदेवांनी दोन भागात उलगडून सांगितले. शाळेमध्ये न शिकलेला खरा इतिहास या तेजस्वी चरित्रातून उलगडला आणि शालेय विद्यार्थ्यांना हा कळला पाहिजे हीच प्रतिक्रिया सर्वांनी दिली.

### दि. २ ऑगस्ट २०२०
### टिळक महाराष्ट्र विद्यापीठ वेबिनार



टिळक पुण्यतिथी शताब्दी वर्षानिमित्त झालेल्या या वेबिनारमध्ये पुणे विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता व संस्कृत विषयाचे अभ्यासक डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी लोकमान्य टिळकांच्या 'ओरायन' अर्थात 'मृगशीर्ष' या विषयावर शोधनिबंध सादर केला. ते म्हणाले, 'लोकमान्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांच्यातील संशोधक, गणितज्ञ आणि तत्त्ववेत्त्याचे दर्शन आपल्याला त्यांचा 'ओरायन' या ग्रंथात होते. यातील सिद्धान्तानुसार प्राचीन काळात अचूक कालगणना, महाभारताचा अचूक कालखण्ड काढता येतो.' हा पूर्ण कार्यक्रम प्रश्नोत्तरासहीत लवकरच यूट्यूबवर उपलब्ध करून दिला जाईल.

* * *

# मर्यादापुरुषोत्तम श्रीराम

सौ. अपर्णा शंकर अभ्यंकर



*दि. ५ ऑगस्टच्या शुभमुहूर्तावर अयोध्येत मा. पंतप्रधान मोदीजींच्या हस्ते भव्य राममंदिराच्या पायाभरणीचा मुहूर्त होतो आहे. कोट्यवधी रामभक्तांसाठी हा अत्युच्च आनंदाचा क्षण. त्यानिमित्त श्रीरामांच्या सद्गुणांचे हे पुण्यस्मरण!*

रघुकुलभूषण प्रभू श्रीरामचंद्रांसारखा मर्यादा पुरुषोत्तम आजपर्यंत दुसरा कोणी झाला नाही, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. श्रीराम साक्षात् पूर्णब्रह्म परमात्मा होते. धर्माचे रक्षण आणि सज्जनांची प्रतिष्ठापना, दुर्जनांचे हनन यासाठीच त्यांचा अवतार झाला होता. परंतु आपल्या चरित्रात त्यांनी मुखातून एकही उद्गार असा काढला नाही की ज्यामध्ये ईश्वरतेचा अभिमान प्रकट होईल. त्यांनी सर्वांसमोर एक सदाचारी आदर्श मनुष्य असण्यासारखेच वर्तन केले. त्यांच्या आदर्श चरित्राला वाचून, ऐकून, स्मरण करून अथवा अंशत: अनुसरून मनामध्ये अत्यंत पवित्र भाव दाटून येतो आणि मन आश्चर्यचकित होते. त्यांचे प्रत्येक कर्म हे आदर्शच आहे.

**श्रीराम सद्गुणांची खाण होते. सत्यता, सहृदयता, मृदुता, दया, क्षमा, वीरता, धीरता, गम्भीरता, अस्त्र-शस्त्र नैपुण्य, पराक्रम, निर्भयता, विनय, शान्ती, तितिक्षा, उपरती, संयम, नि:स्पृहता, नीतिज्ञता, तेज, प्रेम, त्याग, मर्यादा-संरक्षण, एकपत्नीव्रत, प्रतिज्ञापालन, प्रजा-रञ्जकता, ब्राह्मण-भक्ती, मातृ-पितृ-भक्ती, गुरु-भक्ती, भ्रातृ-प्रेम, मैत्री, शरण वत्सलता, सरलता, व्यवहार-कुशलता, साधू रक्षण, दुष्टनिर्दालन, निर्वैरता, लोकप्रियता, अपिशुनता, बहुज्ञता, धर्मज्ञता, धर्मपरायणता, पवित्रता इत्यादी सर्व गुणांचा मर्यादा-पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांच्या ठायी पूर्ण विकास झाला होता. जगामध्ये इतके महान सद्गुण एका व्यक्तीमध्ये पहायला मिळत नाहीत. कोणाला ही कविकल्पना वाटेल. पण प्रभू रामचंद्रांच्या ठायी हे सद्गुण होते.** वाल्मीकि रामायणाच्या बाल आणि अयोध्याकाण्डामध्ये श्रीरामांच्या या अद्भुत गुणांचे अतिशय सुंदर वर्णन आले आहे. ते अवश्य वाचले पाहिजे.

माता-पिता, बन्धु-मित्र, स्त्री-पुरुष, सेवक-प्रजा या सर्वांबरोबर त्यांचे जे असाधारण आदर्श वर्तन होते, त्याच्या नुसत्या स्मरणाने मन आनंदित होते. श्रीरामांप्रमाणे लोकप्रियता त्यांच्यानंतर कोणाच्याच वाट्याला आली नाही. म्हणून आज सहस्रावधी वर्षांनंतरही रामकथेची मोहिनी सर्वांना पडते आहे. त्यांच्या अवतारकालात असा एकही प्राणी नसेल की जो प्रभू रामचंद्रांच्या सौहार्द्रपूर्ण मधुर वर्तनाने मुग्ध झाला नाही.

कैकेयीने श्रीरामांबरोबर कठोर वर्तन केले. परंतु त्यामागे भगवंताची इच्छा आणि देवतांच्या प्रेरणेमुळे लोकहितार्थ तशी ती वागली. परंतु कैकेयीला राम अतिशय प्रिय होता. कारण जेव्हा कैकेयीला मंथरेने रामाविरुद्ध कान भरण्याचा प्रयत्न सुरू केला तेव्हा तिने दिलेले उत्तर पहा–

‘धर्मज्ञो गुणवान् दान्त: कृतज्ञ: सत्यवाञ्छुचि:।
रामो राजसुतो ज्येष्ठो यौवराज्यमतोऽर्हति ॥
भ्रातृन् भृत्यांश्च दीर्घायु: पितृवत् पालयिष्यति।
संतप्यसे कथं कुब्जे श्रुत्वा रामाभिषेचनम् ॥’

(वा. रा. २.८.१४-१५)

‘कुब्जे! राम धर्मज्ञ, गुणवान्, जितेन्द्रिय, कृतज्ञ, सत्यवादी आणि पवित्र आहे. तो राजाचा ज्येष्ठ पुत्र

आहे. त्यामुळे युवराज होण्याचा त्याला अधिकार आहेच. तो दीर्घायुषी होऊन आपल्या भावांचे आणि सेवकांचे पित्याप्रमाणे पालन करेल. मग त्याच्या अभिषेकाची बातमी ऐकून तू का एवढी संतापली आहेस?'

पुढे ती म्हणते,

'यथा वै भरतो मान्यस्तथा भूयोऽपि राघवः ।
कौसल्यातोऽतिरिक्तं च मम शुश्रूषते बहु ।।
राज्यं यदि हि रामस्य भरतस्यापि तत्तदा ।
मन्यते हि यथाऽऽत्मानं तथा भ्रातृंस्तु राघवः।।'
(वा. रा. २.८.१८-१९)

'मला भरत जसा मान्य आहे, त्याच्याहून अधिक राघव प्रिय आहे. तो कौसल्येपेक्षा जास्त माझी सेवा करतो. त्याला राज्य मिळाले म्हणजे भरताला मिळाल्यासारखेच आहे. कारण राघव, आपल्या भावंडांना स्वतःप्रमाणेच मानतो.'

कैकेयीचे श्रीरामांवर केवढे प्रेम आणि विश्वास होता हे यावरून कळते. पण नंतर जे घडले ते मंथरेने तिच्या मनात विष कालवले म्हणूनच!

**श्रीरामांचे देखणे व्यक्तिमत्त्व – श्रीराम हे पुरुषपुंगव होते. शारीरिक दृष्टीने ते निरोगी, सुंदर आणि सुघटित होते. त्यांचे खांदे पुष्ट होते. ते आजानुबाहू होते. त्यांचा गळा शंखासारखा होता. छाती रुंद होती. मस्तक सुंदर होते. ललाट भव्य होते. त्यांचा बांधा मध्यम होता. त्यांचे डोळे टपोरे होते आणि त्यांच्या सर्व देहावर एक अवर्णनीय अशी कांती होती. वयात येईपर्यंत त्यांचे व्यक्तिमत्त्व पूर्ण विकसित झाले होते. आपल्या शौर्य-वीर्यादी गुणांनी ते अयोध्येच्या प्रजाजनांना अत्यंत प्रिय ठरले होते. त्यांनी धनुर्वेद तर आत्मसात केला होताच; शिवाय देव आणि असुर यांच्या शस्त्राचीही उत्तम माहिती करून घेतली होती. हत्ती व घोडे यांच्यावर आत्मविश्वासाने ते स्वार होत असत. ते सैन्यसंचालन उत्तम प्रकारे करीत. संग्रामात ते अजिंक्यच होते. राजकुमार असल्याकारणाने ते राजनीतीच्या व्यवहारात पारंगत होते. क्षात्रधर्मावर त्यांची श्रद्धा होती. सज्जनांचा संग्रह आणि दुर्जनांचा निग्रह कसा करावा हे त्यांना चांगले अवगत होते. त्यांचे हर्षामर्ष कधीही वांझोटे नसत. धर्म, अर्थ व काम या तिन्ही पुरुषार्थाचे त्यांच्या ठिकाणी संतुलन होते. कोणत्याही अशुभ कर्मात त्यांना रुची नव्हती. त्याचे चित्त सदैव शांत, गंभीर असे. ते कृतज्ञ होते आणि कोणाचा अल्पसा उपकारही कधी विसरत नसत. भोग आणि त्याग यांचा योग्य समय त्यांना माहीत असे. ते प्रज्ञा, प्रतिभा आणि धारणा यांचे आगर होते. एकदा अभ्यासलेले त्यांच्या बुद्धीतून कधीही निसटत नसे. संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषा त्यांना अवगत होत्या. संगीत, वाद्य आणि चित्रकला यांचेही त्यांना ज्ञान होते. सामयिक आचार व लोकाचार ते चांगल्या प्रकारे जाणत होते. ब्रह्मचर्याचे नियम पाळून त्यांनी विद्या मिळवली होती. व्यवहारज्ञान आणि तत्त्वज्ञान त्यांनी ऋषिमुनींकडून मिळविले होते. वनवासकालात ते अनेक ऋषिमुनींच्या आश्रमांत गेले आणि त्यांच्याशी सहवास करून त्यांनी काही शस्त्रे संपादन केली आणि बहुश्रुतताही मिळविली. वसिष्ठांच्या सहवासात त्यांना उत्तम तत्त्वज्ञानाचा लाभ झाला.**

**श्रीरामांची मातृभक्ती –** श्रीरामांची मातृभक्ती फारच उच्च कोटीची होती. रामांनी कौसल्येवर, आई म्हणून प्रेम केलेच पण कैकेयीबद्दल त्यांच्या मनातील भक्ती आणि सन्मान कधी तसूभरही कमी झाला नाही.

कैकेयीने मागितलेले ते दोन वर श्रीरामांना सांगण्यासाठी दशरथाला शब्दच फुटेना. त्यावर श्रीरामांनी, काय प्रकार आहे म्हणून कैकेयीला विचारले. तेव्हा कैकेयी म्हणाली. 'तू पित्राज्ञा पाळणार आहेस का? तर सांगते.' आपल्याविषयी कैकेयीने शंका घेतली, असे जाणून श्रीरामांना मरणप्राय दुःख झाले. ते म्हणाले–

'नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेण च हितेन च ।
तद् ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकाङ्क्षितम् ।
करिष्ये प्रतिजाने च **रामो द्विर्नाभिभाषते ।।'**
(वा. रा. अयोध्या. १८.२९.३०)

'राजा, गुरु, पिता या सर्वच दृष्टींनी माझे वडील मला सर्वस्वी आदरणीय आहेत. तेव्हा जे राजाचे अभिलषित असेल, ते तू मला नि:शंकपणे सांग. मी तुला प्रतिज्ञेवर सांगतो, की पित्याचे अभिलषित कितीही दुष्कर असले तरीही मी ते करीन. कारण **श्रीराम एकच वचन दोनदा बोलत नसतो.'**

कौसल्या मातेची समजूत घालून तिच्या महालातून परत येताना चिडलेल्या लक्ष्मणाला श्रीराम म्हणतात,

'लक्ष्मणा! माझ्या राज्याभिषेकामुळे जिच्या चित्तामध्ये संताप होत आहे त्या माता कैकेयीला माझ्यावर कोणताही संशय येणार नाही असाच व्यवहार कर. तिच्या मनात संदेह आल्यामुळे झालेल्या दु:खाला मी क्षणभरही उपेक्षिणार नाही. मी कळत वा नकळत आई-वडिलांसाठी अप्रिय कार्य केले असे मला आठवत नाही.'

अशी श्रीरामांच्या मातृभक्तीची अनेक उदाहरणे रामायणात आढळतात. चित्रकूटाहून परतणाऱ्या भरताला श्रीराम सांगतात,

**'भरता! माता कैकेयीने तुझ्यासाठीच्या राज्यलोभामुळे जे काही केले ते मनात ठेऊ नकोस. तिच्यावर रागावू नकोस. तिची सेवा करत रहा.'**

शत्रुघ्नालाही श्रीराम सांगतात,

'तुला माझी आणि सीतेची शपथ घालून सांगतो की माता कैकेयीबद्दल मनात राग धरू नकोस. सदैव तिच्या सेवेतच रहा.'

श्रीराम वनवासाला निघाले तेव्हा दशरथाच्या अन्य राण्यांनी शोक करत म्हटले, 'जो राम कर्तव्याच्या बाबतीत वडिलांनी काही न सांगताही सर्व अंत:पुरातील स्त्रियांचा आश्रय आणि गती होता, तोच आज वनात निघाला आहे. तो जन्मल्यापासून माता कौसल्येप्रमाणेच आम्हा सर्वांशी प्रेमाने वागत असे.' श्रीरामांच्या मातृभक्तीला मिळालेली ही पावतीच नव्हे काय?

**श्रीरामांची पितृभक्ती –** श्रीरामांची पितृभक्तीही अद्भुत होती. रामायणाचा ज्यांनी अभ्यास केला, वाचन केले त्यांच्या ही गोष्ट लक्षात येईल की **पित्याच्या आज्ञेचे पालन करताना श्रीरामांच्या मनात सदैव उत्साह, साहस आणि दृढ निश्चय होता.** माता कैकेयीला वनात जायच्या अगोदर श्रीराम सांगतात,

'अहं हि वचनात् राज्ञ: पतेयमपि पावके ।।
भक्षयेयं विषं तीक्ष्णं पतेयमपि चार्णवे ।
(वा. रा. २.१८.२८-२९)

'मी महाराजांच्या सांगण्यावरून अग्नीत उडीसुद्धा मारेन. तीक्ष्ण विषाचे प्राशन करेन. समुद्रातसुद्धा उडी मारेन.'

'न ह्यतो धर्मचरणं किञ्चिदस्ति महत्तरम् ।
यथा पितरि शुश्रूषा तस्य वा वचनक्रिया ।।'
(वा. रा. २.१९.२२)

'पित्याची सेवा आणि त्यांच्या आज्ञेचे पालन, याच्याहून महत्त्वाचा या जगात दुसरा कुठलाच धर्म नाही.'

अशी कितीतरी वचने रामायणात सापडतील. म्हणून तर श्रीरामांनी पित्याच्या आज्ञेनुसार १४ वर्षांचा वनवास काटेकोरपणे पाळला. माता कौसल्येला श्रीराम सांगतात,

'नास्ति शक्ति: पितुर्वाक्यं समतिक्रमितुं मम ।
प्रसादये त्वां शिरसा गन्तुमिच्छाम्यहं वनम् ।'
(वा. रा. २.२१.३०)

'मी आपल्या चरणावर मस्तक टेकवून आपली क्षमा मागतो. प्रसन्न व्हा. माझ्याठायी पित्यांच्या आज्ञेचा अवमान करण्याची शक्ती नाही. म्हणून मी वनात जाऊ इच्छितो.'

याशिवाय लक्ष्मण, भरत, ऋषिमुनी यांच्याशी बोलताना श्रीरामांनी पितृभक्तीविषयी बरेच काही सांगितले आहे. श्रीरामचंद्राच्या बालपणाविषयी संक्षेपाने सांगतानासुद्धा वाल्मीकि म्हणतात की श्रीराम सदैव पित्याच्या सेवेत राहात असत.

**भ्रातृ-प्रेम –** श्रीरामांचे बंधूप्रेम अतुलनीय होते. लहानपणापासून श्रीराम आपल्या भावंडांवर खूप प्रेम करत असत. त्यांचे रक्षण करत असत. त्यांना प्रसन्न ठेवत असत. चारी भाऊ एकावेळी घोड्यावर बसत असत. प्रथम भावांना देऊन मग श्रीराम कोणतेही मिष्टान्न खात असत. श्रीरामाचे तिन्ही भावंडांवर सारखे प्रेम होते. तरीही लक्ष्मणाचे श्रीरामांवर विशेष प्रेम होते. थोडावेळसुद्धा श्रीरामांना सोडून तो राहू शकत नसे. म्हणून विश्वामित्रांबरोबर रामांसह लक्ष्मणसुद्धा गेला. विवाहानंतरसुद्धा चारही भावंडे एकत्र राहात.

काही दिवसांनी भरत-शत्रुघ्न आजोळी गेले. श्रीरामांना राज्याभिषेक करायचा ठरला. कौसल्येच्या महालात सुमित्रा आणि लक्ष्मण होते. श्रीराम तेथे आले. ते लक्ष्मणाला काय म्हणतात ते पहा,

'लक्ष्मणेमां मया सार्धं प्रशाधि त्वं वसुन्धराम्।
द्वितीयं मेऽन्तरात्मानं स्त्वामियं श्रीरुपस्थिता ।।
सौमित्रे भुङ्क्ष्व भोगांस्त्वमिष्टान् राज्यफलानि च।
जीवितं चापि राज्यं च त्वदर्थमभिकामये ।।'
(वा. रा. २.४.४३-४४)

'लक्ष्मणा, तू माझ्याबरोबर या पृथ्वीवर राज्य कर. तू माझा दुसरा अंतरात्मा आहेस. ही राजलक्ष्मी तुलाच प्राप्त झाली आहे. तू मनोवांच्छित भोग आणि राज्यफलाचा उपभोग घे. माझे जीवन आणि राज्य तुझ्यासाठीच आहे.'

यानंतर चित्रच बदलले. वनात जाण्याची आज्ञा श्रीरामांनी शिरसावंद्य केली. लक्ष्मणाने बरोबर येण्याचा आग्रह धरला. तेव्हा त्याला संतुष्ट करण्यासाठी श्रीरामांनी होकार दिला. वनात राहताना श्रीराम सर्वप्रकारे लक्ष्मण आणि सीतेला सुख मिळण्यासाठी आणि त्यांना प्रसन्न ठेवण्यासाठी प्रयत्न करीत.

भरत सेनेसह चित्रकूटावर येत आहे हे ऐकून लक्ष्मण क्रोधित झाला. श्रीरामांना टाळून भरत राज्यावर बसणार, ही गोष्ट लक्ष्मणाला रुचली नाही. त्याने भरताचा वध करण्याची इच्छा श्रीरामांपुढे बोलून दाखवली. तेव्हा श्रीराम त्याला निक्षून बोलले–

'यद् द्रव्यं बान्धवानां वा मित्राणां वा क्षये भवेत्।
नाहं तत्प्रतिगृह्णीयां भक्ष्यान्विषकृतानिव ।।
धर्ममर्थं च कामं च पृथिवीं चापि लक्ष्मण ।
इच्छामि भवतामर्थे एतत्प्रतिश्रृणोमि ते ।।'
(वा. रा. अयोध्या. ९७.४-५)

**'मित्र किंवा बांधव यांचा नाश करून जी संपत्ती मिळणार असेल, ती मी कधीच घेणार नाही. विषमिश्रित अन्नाप्रमाणे ती सर्वथा त्याज्य होय. लक्ष्मणा! धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची माझी साधना अथवा ही पृथ्वीदेखील मला केवळ तुम्हा भावांसाठी हवी आहे, हे मी प्रतिज्ञेवर सांगतो.'**

श्रीरामांची वचने ऐकून लक्ष्मणाचा संदेह नष्ट झाला.

भरत श्रीरामांना भेटल्यावर त्यांचे प्रेम आणि वर्तन पाहून सारा समाज चकित झाला. श्रीराम प्रतिज्ञा मोडणार नाहीत हे ऐकल्यावर भरताने श्रीरामांच्या पादुका मागितल्या. अयोध्येजवळ नन्दिग्राम येथून तो राज्यकारभार चालवू लागला. त्यानेही श्रीरामांसारखाच तापसवेष धारण केला. धन्य ते बन्धुप्रेम!

यानंतर युद्धामध्ये रावणाच्या बाणांनी लक्ष्मण मूर्च्छित झाल्यावर श्रीरामांनी जो शोक केला त्यावरून त्यांचे लक्ष्मणावर किती प्रेम होते ते कळते. ते म्हणाले, 'या महातेजस्वी लक्ष्मणाने ज्या प्रकारे वनामध्ये माझे अनुसरण केले, तर आता मीसुद्धा त्याच्या मागोमाग यमलोकाला जातो. तो सदैव

माझा प्रिय बन्धू आणि अनुयायी राहिला आहे.' विलापाची ही पराकाष्ठा म्हणजे बंधूप्रेमाचा उत्कट नमुनाच.

रावणवधानंतर अयोध्येला परत जातानाही त्यांनी प्रथम भरताचे मन पाहिले. तो तितकाच अनुकूल आहे हे जाणल्यावर राज्याचा स्वीकार केला. नंतरही प्रत्येक कार्यात ते भावंडांशी विचार-विनिमय करत असत.

पुढे शत्रुघ्नाने लवणासुराला मारण्याची इच्छा प्रकट केली. तेव्हा श्रीराम म्हणाले, 'तेथील राज्यही तुलाच चालवावे लागेल. माझी ही आज्ञा आहे.' आपल्या धाकट्या भावाला राज्यसुख मिळावे हाच तर त्यांचा हेतू होता.

पुढे प्रतिज्ञापालनासाठी लक्ष्मण वनात गेला. तेव्हा श्रीरामांना त्याचा वियोग असह्य झाला. लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांच्यासह श्रीराम परमधामास गेले. **आयुष्यभर त्यांनी सावत्र भावंडांवर असे प्रेम केले आणि भावंडांनी त्यांच्यावर असे प्रेम केले की बंधुप्रेमाची ही कहाणी युगानुयुगे अमर झाली!**

**आदर्श पती –** श्रीराम हे आदर्श पतीही होते. प्रेम आणि निष्ठा या गोष्टी जर आदर्श पतित्वाच्या निदर्शक असतील, तर श्रीराम त्या बाबतीत उत्तुंग आदर्श आहेत. सीतेवर त्यांचे आत्यंतिक प्रेम होते. वनवासात ते तिची अनेक प्रकारे काळजी घेत असत आणि तिचे अनुरंजन करीत असत. वनात सीतेचा वियोग झाला, तेव्हा त्यांनी सामान्य माणसाप्रमाणे दुःखाचा पूर वाहवला. सीतेचा शोध घेण्यासाठी ते देहभान विसरून भटकले. हे प्रसंग त्यांच्या उत्कट प्रेमाची साक्ष देतात. पुढे **त्यांनी गर्भिणी सीतेचा, आपल्या धर्मपत्नीचा राजकर्तव्य म्हणून त्याग केला. कालिदासाने त्याविषयी एक मार्मिक श्लोकार्ध लिहिला आहे तो (रघुवंश १४.८४) असा–**

**'कौलीनभीतेन गृहान्निरस्ता न तेन वैदेहसुता मनस्ता ।'**

**'लोकापवादाच्या भयाने रामाने सीतेला घरातून बाहेर घालवले, मनातून नाही.'**

सीतात्यागानंतर रामांनी राज्यविषयक सर्व भोग भावांच्या वाट्याला दिले आणि स्वतः विरक्त जीवन स्वीकारले. पुढे त्यांनी यज्ञ केला. त्यात पत्नी म्हणून त्यांनी सीतेची प्रतिकृती आपल्या शेजारी बसवली, पण दुसरी भार्या केली नाही. आपल्या हृदयातले सीतेचे स्थान त्यांनी अढळ राखले. म्हणूनच श्रीराम हे एकपत्नीव्रताचे महान आदर्श ठरले.

**मनात आणले असते तर यज्ञाच्या वेळी तरी ते दुसरा विवाह करू शकले असते. यामुळे त्यांची अपकीर्तीही झाली नसती. परंतु ते मर्यादापुरुषोत्तम होते. त्यांना त्यांच्या चरित्रातून हेच दाखवायचे होते की स्त्रीला पातिव्रत्य आवश्यक आहे त्याप्रमाणे पुरुषालाही एकपत्नीव्रत परमावश्यक आहे. स्त्री-पुरुष संबंध भोगासाठी नाहीत तर धर्माचरणासाठी आहेत. श्रीरामांनी हे आचरून दाखवले.**

**आदर्श मित्र –** रामायणात निषाधाधिपती गुह आणि वानरराज सुग्रीव हे दोघे रामाचे मित्र या नात्याने दिसतात. 'या संपूर्ण विश्वात रामाइतका दुसरा कुणीही प्रिय नाही' असे गुह शपथेवर सांगतो. श्रीरामांनीही त्याच्या बाबतीत म्हटले आहे, की 'मी माझ्या स्वतःवर जितके प्रेम करतो तितकेच गुहावर करतो. कारण तो माझा सखा आहे.' अग्निसाक्षीने सुग्रीवाशी मित्रत्व जोडले गेल्यावर श्रीराम त्याला म्हणतात की 'आपणा दोघांचे सुख-दुःख आता अगदी एकरूप झाले आहे.' एकमेकांच्या उपयोगी पडणे, हे मैत्रीचे फळ श्रीरामांनी मान्य केले आहे. म्हणूनच त्यांनी सुग्रीवाच्या स्त्रीचे अपहरण करणाऱ्या वालीचा वध केला. श्रीराम जेव्हा महाप्रस्थानाला निघाले, तेव्हा सुग्रीवही त्यांच्याबरोबर महायात्रेसाठी सिद्ध झाला. त्यावेळी श्रीराम त्याला म्हणतात– **'मित्रा सुग्रीवा, माझे वचन ऐक! मी तुझ्याविना**

**देवलोकात वा परमधामातही जाऊ शकत नाही.'** (वा. रा. उत्तर. १०८.२५)

श्रीरामांना राज्याभिषेक झाल्यावर वानरसेनेतील प्रमुखांना आपल्या जवळ बोलावून प्रभू रामचंद्र त्यांना प्रेमभऱ्या नजरेने बघत म्हणाले,

'आपण सर्व वानर माझे सुहृद आहात, बंधू आहात, शरीर आहात. तुम्ही लोकांनी संकटात मला साथ दिलीत. तुमच्यासारख्या श्रेष्ठ मित्रांबरोबर राजा सुग्रीव धन्य आहे.' (वा. रा. ७.२९.२३-२४) **सुग्रीवादी मित्रांनी श्रीरामांच्या या सख्यप्रेमाची वारंवार प्रशंसा केली आहे. ते श्रीरामांच्या वर्तनामुळे इतके मुग्ध होत असत की त्यांना धन, जन, भोग यांची आठवण उरत नसे. श्रीरामचंद्रांवर प्राण ओवाळून टाकायची त्यांची तयारी असे. हनुमंतांवर त्यांनी असे प्रेम केले की तो त्यांचा जन्मोजन्मीचा दास झाला.**

श्रीरामांनी सुग्रीवाला भाऊ म्हणून संबोधिले आहे. **'त्वमास्माकं चतुर्णां वै भ्राता पञ्चमः ।'** (वा. रा. ६.१२७.४४) अर्थात् **'हे सुग्रीव, तू आम्हा चार भावंडांचा पाचवा भाऊच आहेस!'**

**प्रजावत्सलता –** श्रीरामांनी प्रजेवर आणि प्रजेने श्रीरामांवर केलेले प्रेम, पुराणे आणि इतिहास यात अद्वितीय आणि अतुलनीय आहे. प्रजेसाठी श्रीराम कोणताही त्याग करायला कचरले नाहीत. 'प्रजेच्या कल्याणासाठी मी माझ्या बंधूंचा, पत्नीचा आणि स्वत:च्या प्राणांचाही त्याग करीन' असे ते बोलले आहेत.

'कीर्त्यर्थं तु समारम्भः सर्वेषां सुमहात्मनाम् ।
अप्यहं जीवितं जह्यां युष्मान् वा पुरुषर्षभाः ॥
अपवादभयाद् भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ।
तस्माद् भवन्तः पश्यन्तु पतितं शोकसागरे ॥'
(वा. रा. ७.४५.१४-१५)

'कीर्तीची लोकामध्ये प्रशंसा होत असते आणि सर्वही महात्मे कीर्ती संपादन करण्याकरताच खटपट करीत असतात. हे पुरुषश्रेष्ठहो, लोकापवादरूप भयाला भिऊन मी जीविताचा अथवा तुमचाही त्याग करीन, मग जनक कन्येची गोष्ट पाहिजे कशाला? सांप्रत शोकसागरामध्ये पडलेल्या मला तुम्ही अवलोकन करा.'

प्रजेच्या मनात सीतेच्या चारित्र्याबद्दल किंतु उत्पन्न झालेला आहे, हे समजून येताच त्यांनी यत्किंचितही विलंब न लावता आपल्या प्राणप्रिय पत्नीचा त्याग केला.

ते प्रजेवर मुलापेक्षाही जास्त प्रेम करत आणि सदैव त्यांच्या हितामध्ये दक्ष असत. म्हणून 'रामराज्य' ही संकल्पना आदर्श राज्याचे विशेषण बनली. आज हजारो वर्षे उलटल्यावरही अगदी खेड्यातील निरक्षर मनुष्यही 'रामराज्य' हवे असे म्हणतो. अयोध्यावासियांचे रामावर अद्भुत प्रेम होते. राम वनवासाला निघाले तेव्हा अर्धेअधिक लोक वेड्यासारखे त्यांच्यामागून निघाले. वर्णन असे आहे की पशुपक्षीसुद्धा मुग्ध झाले. त्यांनासुद्धा त्यांचा वियोग असह्य झाला. रामचंद्र परमधामाला गेले तेव्हाचे वर्णनही असेच अद्भुत आहे. **जटायू (पक्षी), सुग्रीव-हनुमन्त (वानर), बिभीषण (राक्षस), गुह (निषाद), शबरी (भिल्लीण) - या सर्वांना श्रीरामांनी आपले म्हटले!**

**धर्मविजयी राम –** श्रीराम हे सामर्थ्याचे महानिधी होते. पण आपला पराक्रम त्यांनी धर्माच्या सिद्धीसाठी आणि प्रतिष्ठेसाठीच वापरला आहे. मारीच राक्षस हा श्रीरामांचा शत्रू होता; पण तोच जेव्हा श्रीरामांच्या पराक्रमाचे वर्णन करतो, तेव्हा त्या वर्णनाला विशेष गौरव प्राप्त होतो. मारीच म्हणतो–

'रामो विग्रहवान् धर्मः साधुः सत्यपराक्रमः ।
राजा सर्वस्य लोकस्य देवानामिव वासवः ॥'
(वा. रा. अरण्य. ३७.१३)

**'राम हा मूर्तिमंत धर्म आहे. तो सज्जन आहे आणि सत्यपराक्रमी आहे. देवांचा जसा इंद्र तसा**

**तो सर्व लोकांचा राजा आहे.'**

धर्म हीच श्रीरामांच्या अंत:करणाची प्रेरक शक्ती होती. त्यांनी लक्ष्मणाला एकदा सांगितले, की मी जर संतापलो तर एकट्या अयोध्येचीच काय कथा, पण संपूर्ण पृथ्वीदेखील पराजित करीन; पण मला तसे करता येत नाही. कारण तो अधर्म ठरेल. वनवासाची आपत्ती मी स्वीकारतो याचे कारण, माझा धर्म व सद्गती यांचे रक्षण व्हावे, हे आहे.

**आत्मप्रत्यय –** श्रीरामांचा आत्मप्रत्यय विलक्षण होता. युद्धप्रसंगी थकलेल्या आणि प्राणसंकटात सापडलेल्या रावणावर हत्यार न चालवता त्यांनी रावणाला सोडून दिले आणि 'उद्या पूर्ण तयारीनिशी लढायला ये' असे सांगितले.

रावणाबरोबर ते लढले आणि त्यांनी रावणाला मारलेही. पण त्यांनी त्याची अवहेलना कधीच केली नाही. रावण युद्धात पडल्यावर बिभीषण त्याची अन्त्यक्रिया करण्यास तयार नव्हता, तेव्हा श्रीरामांनी त्याला बजावले,

'रावण कसाही असो; पण त्याने शूर म्हणून अनेकवार रणांगणात कीर्ती मिळविली आहे. जिवंतपणी त्याने साऱ्या विश्वाचा थरकाप उडविला होता. शत्रुत्व मरेपर्यंतच असते. रावण मेल्यावर त्याचे व माझे शत्रुत्वाचे प्रयोजन संपले आहे. बिभीषणा, तू त्याचा अन्त्यसंस्कार कर. आता तो माझा शत्रू नसून तुझ्याशी त्याचे जे नाते, तेच माझ्याशीही आहे.'

**वालीचा अंत्यसंस्कारही श्रीरामांनी असाच औदार्याने करविला.**

**औदार्य –** श्रीरामांचे कोणत्याही व्यक्तीशी वैर नव्हते; तर पाप, अधर्म व अत्याचार यांच्याशी त्यांचे वैर होते. जगात आर्त हा शब्द राहू नये, एवढ्यासाठीच क्षत्रियांनी धनुष्य धारण करायचे असते, अशी त्यांची धारणा होती. वालीला मारल्यावर किष्किंधेचे राज्य, विजेता या नात्याने, श्रीरामांचेच होते. पण त्यांनी ते सुग्रीवाला दिले आणि वालीपुत्र अंगदाला यौवराज्याचा अभिषेक करून राज्याची गादी वालीच्याच वंशात कायम ठेवली. लंकेचे राज्य तर निर्विवादपणे श्रीरामांचेच होते; पण लंकेत पायही न ठेवता त्यांनी ते बिभीषणाच्या स्वाधीन केले आणि त्याला बजावले–

'लङ्कां प्रशाधि धर्मेण धर्मज्ञस्त्वं मतो मम ।'
(वा. रा. उत्तर. ४०.१०)

'हे बिभीषणा, तू धर्मज्ञ आहेस, असे मी मानतो. तेव्हा तू धर्ममर्यादा पाळूनच लंकेत राज्य कर.'

**शरणागतवत्सलता –** श्रीरामांच्या शरणागत झालेल्यांप्रत वात्सल्यतेचे वर्णन रामायणात ठिकठिकाणी आले आहे. परंतु रावणाकडून अपमानित झाल्यावर बिभीषण भगवान श्रीरामांना शरण आला तो प्रसंग भक्तांच्या मनात अपार भक्ती निर्माण करणारा आहे.

बिभीषणाचे धर्मयुक्त भाषण रावणाने ऐकले नाही तेव्हा बिभीषण तेथून निराश आणि दु:खी होऊन श्रीरामाला शरण आला. त्याला आकाशमार्गातून येताना पाहून सुग्रीवाने सर्व वानरांना सावध केले. राक्षस-स्वभावाचे वर्णन करून श्रीरामांनाही सावध केले. इतर वानरांनीही संशय व्यक्त केला. मात्र हनुमंताने तो निर्दोष शरणागत असल्याची ग्वाही दिली. सगळ्यांची मते ऐकल्यावर श्रीराम म्हणाले,

'मित्रभावेन सम्प्राप्तं न त्यजेयं कथञ्चन ।
दोषो यद्यपि तस्य स्यात् सतामेतदगर्हितम् ।।'
(वा. रा. ६.१८.३)

'मित्रभावाने आलेल्या बिभीषणाचा मी कधी त्याग करू शकत नाही. त्याच्यामध्ये दोष असला तरीसुद्धा त्याला आश्रय देणे हे अनुचित होणार नाही.'

सुग्रीवाने शंका निर्माण केल्यावर रामांचे आश्वासक शब्द फार अर्थपूर्ण आहेत. ते म्हणतात,

'वानरेश्वरा! मी इच्छा असेल तर पृथ्वीवरील पिशाच, दानव, यक्ष, राक्षस यांना बोटाच्या

टोकानेसुद्धा मारू शकतो म्हणून घाबरू नकोस. परंतु जर कोणी हात जोडून दीन भावाने शरण येऊन अभय मागेल तर दयाधर्माचे पालन करण्यासाठी त्याला मारता कामा नये. माझा तर पण असा आहे की जो एकदा जरी 'मी आपल्याला शरण आहे' असे म्हणून माझ्याकडून रक्षण मागेल त्याला मी सर्व प्राणिमात्रांपासून अभय देतो. मी बिभीषणाला अभय दिले आहे. त्याला तू घेऊन ये. मग तो बिभीषण असो वा रावण!'

बिभीषणाला रामांनी अभय तर दिलेच पण समुद्रतटी समुद्रजलाने त्याला राज्याभिषेक करून आश्वासित केले.

वनवासामध्ये चौदा सहस्र राक्षसांना श्रीरामांनी मारल्यावर श्रीरामांचा पराक्रम पाहून सीता चकित झाली. परंतु तिने श्रीरामांना विचारले, 'या राक्षसांशी आपले तर काहीच वैर नाही. मग त्यांना का बरे मारलेत?' तेव्हा प्रभू रामचंद्र उत्तरले- 'हे राक्षस निष्पाप ऋषींना त्रास देतात. त्यांचे रक्षण करणे हे माझे क्षत्रियाचे कर्तव्य आहे. मी अभय देण्यासाठी या दुष्टांना मारले.'

किती विवेकपूर्ण शब्द!

**कृतज्ञता –** खरे तर श्रीराम अवतारी महात्मा होते. त्यांच्यामध्ये अपार शक्ती होती. ते स्वत: काहीही करू शकत होते. त्यांच्यावर कोण आणि कसले उपकार करणार? परंतु परस्पर प्रेमाची वृद्धी व्हावी म्हणून संबंधितांच्या साध्या सेवेला मोठे महत्त्व देऊन त्यांनी कृतज्ञता प्रकट केली आहे.

सीतेला शोधताना श्रीरामांनी जटायूला अर्धमेल्या अवस्थेत पाहिले. त्याने रावणाने सीतेला नेल्याची बातमी प्रथम श्रीरामांना सांगितली आणि प्राण सोडले. त्याही अवस्थेत श्रीरामांनी स्वत: आपल्या हाताने त्याची दहनक्रिया केली. कशी अद्भुत कृतज्ञता ही!

असे अनेक प्रसंग आहेत. वानर, राजे, ऋषी, देवता सर्वांशी बोलताना श्रीरामांनी वेळोवेळी कृतज्ञता प्रकट केली. ती अशी की तुमच्यामुळे, तुमच्या सहकार्यामुळे मी रावणावर विजय मिळवू शकलो.

हनुमंताबद्दल तर काय बोलावे? सीताशोध लावल्यावर त्याच्या कामगिरीची श्रीरामांनी वारंवार प्रशंसा केली आहे. शेवटी तर प्रभू रामचंद्र म्हणतात, 'तुला देण्याजोगी वस्तूच मला दिसत नाही. म्हणून माझे सर्वस्व असे आलिंगन तुला देतो.' असे म्हणून श्रीरामांनी हनुमंताला हृदयाशी धरले. हनुमंताच्या सेवेचे आणि कार्याचे वर्णन राज्याभिषेकानंतर श्रीराम करतात–

**'हनुमन्ता! तुझ्या एका एका उपकारासाठी मी प्राण दिले तरी मी तुझा ऋणीच राहीन. तुझ्या उपकारांची परतफेड करण्याची संधीच मला मिळायला नको. कारण 'आपत्ती आली तरच मनुष्याला प्रत्युपकाराची पात्रता येते.'**

कृतज्ञता असावी पण स्वजन तितक्या दर्जाचे असतील तर! श्रीराम असे दक्ष होते.

**राजनीतिज्ञ श्रीराम –** प्रभू रामचंद्रांनी आयुष्यभर श्रेष्ठ राजनीतीच आचरली. अयोध्येच्या राज्याचा त्याग करून ते वनवासासाठी बाहेर पडले. परंतु रघुकुलातील राजे श्रेष्ठ आचरण करतात आणि मनूने घालून दिलेल्या नियमानुसार आचरण करावे ही भावना सदैव त्यांच्या मनामध्ये होती. त्यांनी कोठलेच कृत्य राजधर्माला सोडून केले नाही. योद्धा म्हणून ते शस्त्र-अस्त्र विद्येत अत्यंत प्रवीण होतेच. परंतु त्यांनी शस्त्रास्त्रांचा गैरवापर कधीही केला नाही. त्यांना लंकेतील नागरिकांची काळजी होती म्हणून लंकेवर विध्वंसक अस्त्र टाकले नाही. रावणमित्र वालीला मारतानाही त्यांनी मनूने सांगितलेल्या वचनानुसार वर्तन केले. ते म्हणतात, 'पापी पुरुषाला शासन न करणाऱ्या राजाला त्याचे पातक लागते. आम्ही स्वतंत्र नसून धर्माधीन आहोत. भरत सांप्रत पृथ्वीचा राजा आहे आणि त्याने आमची धर्मसंरक्षणार्थ योजना केली आहे.'

हे वालीला इतके पटले की ज्ञानप्राप्त होऊन तो रामांपुढे नत झाला. सीता अपहरण झाल्यावर राजनीतिज्ञ श्रीरामांनी सुग्रीवाशी मैत्री करून सगळी वानरसेना आपलीशी करून घेतली. नेता म्हणून ते इतके थोर होते की बेसावध न राहता सर्व सैन्याची लंकेच्या बाहेर व्यूहरचना करून घेतली. रावणाशी मंत्रयुद्ध खेळून आधीच खच्चीकरण केले. सुग्रीवाने थेट रावणाच्या राजवाड्यात उडी घेतली तेव्हा 'तुझ्यासारख्या राजाला असे अविचारी कृत्य शोभत नाही' म्हणून कानउघाडणीही केली. परंतु रावण मृत झाल्यावर त्याच्या देहाची विटंबनाही केली नाही. रावणाला मारताना योद्धा म्हणूनही त्यांनी अतुलनीय पराक्रम केला. असे हे थोर राजनीतिज्ञ श्रीराम!

**क्षमाशील पराक्रमी –** पराक्रमी वीरालाच क्षमा शोभून दिसते. श्रीराम पराक्रमी होते. संपूर्ण रामायणात त्यांच्या पराक्रमाचे असंख्य प्रसंग आहेत. ताटका, सुबाहूवध, परशुरामांचे धनुष्य उचलणे, पञ्चवटीत चौदा हजार राक्षसांचा वध, वालीवध, समुद्राची शरणागती, लंकेत कुंभकर्णासहित रावणाचा वध असे असंख्य प्रसंग रामचंद्राच्या पराक्रमाची साक्ष आहेत. तरीही त्यांनी सर्वांना क्षमा केली. त्यांनी क्रोध वा युद्ध प्रकट केले ते दुष्टांना निर्दोष बनवण्यासाठीच. मन्थरेसारख्या दासीच्या अपराधाचा त्यांनी कोठे उल्लेखसुद्धा केला नाही. असा हा संयमी महापुरुष!

**श्रीरामांची महत्ता –** श्रीराम साक्षात् भगवान विष्णूचे अवतार होते. ही गोष्ट वाल्मीकि रामायणात वारंवार उल्लेखिली गेली आहे.

पृथ्वीतलावर रावणाचा उपद्रव खूप वाढला तेव्हा देवता आणि ऋषिगण फार दु:खीकष्टी झाले. त्यांनी ब्रह्मदेवाची प्रार्थना केली. त्यावेळी गरुडावर आरुढ होऊन शङ्ख, चक्र, गदाधारी विष्णू तेजस्वी स्वरूपात प्रकट झाले. देवतांची प्रार्थना ऐकून भगवंतानी राजा दशरथाच्या घरी मनुष्यरूपात अवतार घेण्याचे मान्य केले आणि ते अंतर्धान पावले.

श्रीराम विष्णूचे अवतार आहेत का नाही याची परीक्षा स्वत: परशुरामांनी घेतली. त्यांनी श्रीरामांना विष्णूच्या धनुष्याला बाण चढवायला सांगितला. श्रीरामांनी ते कृत्य सहज केले. ते पाहून परशुराम चकित झाले आणि श्रीरामांची स्तुती करून, प्रदक्षिणा घालून निघून गेले.

रावणवध झाल्यावर ब्रह्मासह सर्व देवता श्रीरामचंद्रांकडे आल्या तेव्हा त्यांच्याशी संवाद करताना राम म्हणाले, मी तर स्वत:ला दशरथाचा पुत्र राम नावाचा मनुष्यच समजतो- आत्मानं मानुषं मन्ये - मी कोण आहे ते आपण सर्वजण मला सांगा.'

स्वत: ब्रह्मदेवांनी रामाचे वर्णन केले ते असे–

'भवान्नारायणो देव: श्रीमांश्चक्रायुध: प्रभु: ।
एकशृङ्गो वराहस्त्वं भूतभव्यसपत्नजित् ॥
अक्षरं ब्रह्म सत्यं च मध्ये चान्ते च राघव ।
लोकानां त्वं परो धर्मो विष्वक्सेनश्चतुर्भुज: ॥
शार्ङ्गधन्वा हृषीकेश: पुरुष: पुरुषोत्तम: ।
अजित: खड्गधृग् विष्णु: कृष्णश्चैव बृहद्बल:॥
(वा. रा. ६.११७.१४-१६)

'आपण साक्षात् चक्रपाणि लक्ष्मीपती नारायणदेव आहात. आपण भूत-भविष्यातील शत्रूंना जिंकणारे आणि एकशृंगधारी वराह आहात. आपण आदि, मध्य आणि अंती सत्यरूपाने परिपूर्ण, अविनाशी ब्रह्म आहात. आपण परमधर्म चतुर्भुज विष्णू आहात. आपण अजित, पुरुष, पुरुषोत्तम, हृषीकेश तसेच खड्ग आणि शाङ्र्गधनुष्यधारी विष्णू आहात. आपण महाबलवान कृष्ण आहात.'

**श्रीरामांच्या सद्गुणांचे यथार्थ वर्णन महर्षी वाल्मीकींपासून आजपर्यंतच्या कवींपर्यंत कोणालाही करता आले नाही. इतका तो सद्गुणांचा सागर आहे. त्यातील मोती शोधावे आणि स्वत:ला धन्य समजावे. त्या मानवरूपी दिव्यत्वाला शतश: प्रणाम!**

* * *

# राममंदिर आणि तरुण पिढी

– श्री. श्रीकांत आठवले

।।जय श्रीराम ।।

राम मंदिर या विषयावर सोशल मीडियावर व्यक्त व्हायला शहरी तरुण पिढी लाजत आहे का?

मित्रांनो, अयोध्येतील राम मंदिर हे काय फक्त भाजपा, विश्व हिंदू परिषद किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाहीये. प्रयत्न फक्त त्यांचेच असले तरी जे मंदिर उभे राहणार आहे ते समस्त हिंदूंचे आहे. त्यामुळे सोशल मीडियावर व्यक्त होताना तुमचा सेक्युलर नेता, ऑफिसचा बॉस, शेजारी, गर्लफ्रेंड, मित्र परिवार काय म्हणतील, हा कसला आउटडेटेड आहे असे तर नाही ना म्हणणार? हे असले विचार मनातून काढून टाकले पाहिजेत, आणि आजच्या तरुण पिढीने व्यक्त झाले पाहिजे. मी बऱ्याच सोशल मीडिया ग्रूप वर ही भंकस चर्चा पहिली आहे, की बाबरी का पडायची गरज होती, त्याच्या बाजूला मंदिर बांधायचे होते, आता तिथे मंदिर नको आणि मस्जिद पण नको तर फक्त हॉस्पिटल व्हावे, इ काहीतरी फालतू बडबड...

हे तेच लोक आहेत जे अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी खाली फोटो काढताना म्हणतील भारतात असल काही भारी होणारच नाही आणि दुसरीकडे सरदार वल्लभभाई पटेलांच्या स्मारकाला किती पैश्याचा चुराडा केला? असले फाजील प्रश्न विचारतील. हे तेच लोक जे बुर्ज खलिफाचे कौतुक करतील पण छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रातील स्मारक कशासाठी? असले भंपक प्रश्न विचारतील. हे तेच लोक आहेत जे ट्विटर वर मोठमोठ्या हाय फाय इंग्लिश लोकांना फॉलो करतील पण एक ट्विट काय संस्कृतमध्ये आले तर मोदींना पार हिटलर बनवून टाकतील.

बाबर काही आपला कोण नव्हता, तो आला, गेला,मेला. तो ढाचा ऐतिहासिक राम मंदिर पाडून बांधण्यात आला होता. हा केवळ एका मंदिराचा विषय नाहीये, आपल्या सांस्कृतिक मानबिंदूचा विषय आहे, जे आपण कधीच जपले नाहीत, त्याचा अभिमान बाळगला नाही. हेच काशी, मथुरा, सोमनाथला झाले. कारण आपण आपल्या अभिमानाचा बळी दिला. शेकडो वर्षे गेली तेव्हा कुठे शिवनेरीवर सोनेरी पहाट उगवली, पण हे काही सारखे होणे नाही. छत्रपती शिवरायांनी जे राज्य निर्माण केले त्यात सर्व जाती-धर्माचा आदर आहेच पण त्याहून तुमच्या स्वत:च्या अस्मितेचा आदर आहे, म्हणून ते फक्त स्वराज्य नव्हे तर हिंदवी स्वराज्य आहे.

तेव्हा मित्रांनो, हे आपल्या हातात आहे की आपण आपला अभिमान जपायचा की खोट्या प्रचाराला बळी पडायचे! या हिपॉक्रसीने भरलेल्या लिब्रांडू मोहिमेला बळी पडायचे की जे आपले सत्व आहे त्याचा जयघोष करायचा! आज जर आपण आपला अभिमान गहाण ठेवला तर परत बाबर, खिलजी, कासिम, अब्दाली यांच्या धाडी येतीलच. फरक एवढाच असेल या वेळेस या धाडी आपल्याच देशातील लिब्रांडू लोकांच्या असतील, ज्या अधिक भयावह असतील कारण त्या अदृश्य आणि वर्चुअल असतील! जागे व्हा, व्यक्त व्हा!!

* * *



# श्रद्धांजली



## कै. सौ. शीला लाडू वारंग

आदित्य प्रतिष्ठानच्या परिवारातील ज्येष्ठ आणि निष्ठावान कार्यकर्त्या वारंगआजी यांचे ३० मे २०२० रोजी वयाच्या ८५ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

महानगरपालिकेच्या शाळेत त्यांनी शिक्षिका म्हणून उत्तम काम केले. सावंतवाडी मराठा संस्थान, दादर येथील सभागृहाच्या स्थापनेचा, पतपेढी सांभाळण्याचा कार्यभार त्यांनी पतीसह उत्तम प्रकारे पेलला.

दादर केंद्रात त्या कार्यकर्ती म्हणून नियमित येऊ लागल्या. प्रवचनमाला, कक्षावर काम, शिबिर व अन्य कार्यक्रमांना उत्साहाने उपस्थिती, प्रवचनमाला प्रायोजित करणे, संतपीठासाठी देणग्या यातून गुरुदेव-सौ. वहिनींच्या कार्यावरील त्यांची अढळ निष्ठा सर्वांनाच प्रेरणा देत असे. उत्तम हस्ताक्षर, गुरुदेवांच्या ग्रंथातील व प्रवचनांची टिपणे सतत काढणे, गरजवंताला मदत करणे, टाकाऊतून टिकाऊ वस्तू करणे, शांत-सौम्य संभाषण हे उत्तम शिक्षिकेचे गुण त्यांच्यात प्रकर्षाने होते.

प्रतिष्ठानच्या कार्यावर अढळ श्रद्धा असणाऱ्या, नातवंडांना महाजन करणाऱ्या, स्वत: वैष्णव झालेल्या आणि प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांना आईची/आजीची माया देणाऱ्या वारंग आजींचे निधन आदित्य परिवाराला चटका लावून गेले.

'''आदित्यव्रती' म्हणून तुम्ही नक्की परत याल'' असा अपर्णावहिनींनी त्यांना आदरांजली वाहताना प्रकट केलेला विश्वास आजींच्या निष्ठेची उत्कटताच दर्शवितो.

वारंग परिवाराच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत. अत्यंत निष्ठावान वारंग आजींना आदित्य परिवारातर्फे सश्रद्ध श्रद्धांजली! ईश्वर त्यांना सद्गती देवो ही प्रार्थना!

* * *

## कै. डॉ. पुष्पाताई रमेश प्रभू

प्रतिष्ठानच्या सुहृद आणि हितचिंतक अशा डॉ. सौ. पुष्पाताई प्रभू यांचे वयाच्या ऐंशीव्या वर्षी दि. ११ जून २०२० या दिवशी, हृदयविकाराने दु:खद निधन झाले.

डॉ. रमेश प्रभू आणि डॉ. सौ. पुष्पाताई रमेश प्रभू हे आदित्य प्रतिष्ठानच्या परिवारातील निष्ठावान आदित्यव्रती होते. आदित्य प्रतिष्ठान आणि गुरुदेव अभ्यंकर पतिपत्नींवर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. शालेय-महाविद्यालयीन कार्यक्रम असोत, दीनानाथ मंगेशकर सभागृहाची बांधणी असो, महत्त्वाची बस सेवा, ग्रंथ प्रकाशन, क्रीडा संकुलाचे काम असो, प्रत्येक कार्यात या दोघांचा सहभाग होता. वैयक्तिक अडी-अडचणींमध्येही ते अनेकांच्या मदतीस उभे राहात असत. कै. डॉ. रमेश प्रभू हे मुंबईचे महापौरही झाले.

आदित्य प्रतिष्ठानचा 'वैश्विक संतभारती प्रकल्प' लवकरात लवकर उभा राहावा म्हणून यांनी भरघोस आर्थिक पाठबळ दिले. हे दाम्पत्य रु. ११ लक्ष रुपये दान देऊन कक्षदातेही झाले. गुरुदेव या दाम्पत्याबद्दल नित्य आदराने म्हणत, 'पार्ल्यात घरं खूप पाहिली, पण 'प्रभुघर' मात्र एकच'.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ट्रस्ट (जुहू) च्या खजिनदार म्हणून त्या काम पाहात होत्या. या ट्रस्टतर्फे प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे व्यवस्थापनही त्याच करत होत्या. ऐंशी वर्षे वय असूनही त्यांची कामातील तडफ कौतुकास्पद होती. सौ. पुष्पाताईंचे वडील कै. गणपतराव तापसे हरयानाचे राज्यपाल म्हणून कार्यरत होते.

त्यांचे पुत्र श्री. अरविंद प्रभू हेही कर्तृत्ववान आहेत. समस्त आदित्यव्रती या दु:खात त्यांच्या बरोबर आहेत.

* * *

# श्रद्धांजली



**कै. श्री. अशोक जालनावाला**


आदित्य प्रतिष्ठानच्या कार्यावर भक्ती असणारा एक धडाडीचा निष्ठावान कार्यकर्ता- श्री. नीलेश जालनावाला यांचे वडील आणि सौ. वंदनाताई जालनावाला यांचे पती श्री. अशोक जालनावाला यांचे दि. २३ जून २०२० या दिवशी, बेलापूर येथे अपोलो रुग्णालयात दु:खद निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. त्यांचे सुहास्य आणि राजबिंडे व्यक्तिमत्त्व हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

पत्रकारितेच्या छत्तीस वर्षांच्या प्रदीर्घ प्रवासात त्यांच्या विशेष लेखांनी विविध विषयांना वाचा फोडली. दैनिक लोकसत्ता आणि दैनिक सकाळमध्ये त्यांनी आपल्या लेखनाचा ठसा उमटवला. नवी मुंबई शहराच्या जडणघडणीचे ते मूर्तिमंत साक्षीदार होते आणि त्यांचा या कामात मोलाचा वाटा होता.

प्रकल्पग्रस्तांचा संघर्ष, सिडको (BMTC) बस सेवा, श्री. गणेश नाईक यांचा राजकीय उत्कर्ष, गाजलेले गुन्हे, उच्च राजकीय वर्तुळातील भ्रष्टाचार या विषयांवरील त्यांचे प्रभावी लेखन म्हणजे प्रथमच पत्रकारिता क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या पत्रकारांसाठी आदर्श वस्तुपाठ होता. श्री. जालनावाला यांच्याविषयी सामाजिक, राजकीय वर्तुळांमध्ये आणि सरकारी अधिकाऱ्यांमध्ये आदर होताच आणि आश्चर्ययुक्त दबदबाही होता. श्री. जालनावाला नवी मुंबई पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष होते.

त्यांचे ज्येष्ठ पुत्र मनोज नव्या मुंबईतील प्रेसक्लबचे संस्थापक अध्यक्ष आहेत. श्री. निलेश जालनावाला आणि त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात समस्त आदित्यव्रती सहभागी आहेत. ईश्वराने त्यांना या दु:खाला सामोरे जायचे बळ द्यावे. कै. श्री. अशोक जालनावाला यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

* * *



**कै. पुरुषोत्तम ग. करंदीकर**

आदित्य प्रतिष्ठानच्या परिवारातील ज्येष्ठ आणि बुद्धिमान कार्यकर्ते श्री. करंदीकर काका यांचे दि. १५ जुलै रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

१८ मार्च १९३० मध्ये जन्म झालेल्या काकांचे शिक्षण पुण्यात (नू. म. वि. आणि फर्ग्युसन) झाले. (B.Sc. Tec in oils, Fats & Soaps from UDCT in 1952) पुढे पदव्युत्तर शिक्षण घेऊन त्यांनी हिंदुस्थान लीव्हर येथे २२ वर्षे नोकरी केली. परदेशातही आपल्या कामाचा ठसा उमटविला. आयुशक्ती या आयुर्वेदिक संस्थेचे ते सल्लागार होते. टेनिस, बिलिअर्डस या खेळात अनेक बक्षिसे मिळविली होती. भारतीय संगीतातही विलक्षण रुची होती आणि ते अशा कार्यक्रमांना नियमित जात.

त्यांचे कौटुंबिक जीवनही उत्तम संपन्न झाले. डिसेंबर २०१९ मध्ये त्यांचा ६५ वा विवाह वाढदिवस साजरा झाला. पणतू आणि पणती बघण्याचे भाग्य त्यांना लाभले.

एक उत्तम आणि परिपूर्ण जीवन जगणारे काका प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात, कीर्तनात, वर्धापनदिनात, तीर्थयात्रेत सानंद सहभागी होत. गुरुदेव-सौ. वहिनींवर आणि प्रतिष्ठानच्या कार्यावर त्यांची दृढ श्रद्धा होती. संतभारती निर्मितीविषयी त्यांना प्रचंड ओढ होती.

त्यांच्या प्रेरणादायी स्मृतीला प्रतिष्ठानचा परिवार सदैव हृदयात जपेल आणि हे कार्य वाढवित राहील हीच त्यांना मन:पूर्वक आदरांजली. करंदीकर कुटुंबियांच्या दु:खात प्रतिष्ठान परिवार सहभागी आहे. काकांना सद्गती मिळो हीच ईशचरणी प्रार्थना!

* * *

# माझ्या तरुण मित्रांनो!



गुरुदेव

आज तुम्हा सर्वांशी हा अनौपचारिक संवाद करताना माझे मन आनंदाने भरून वाहात आहे. आज दि. ५ ऑगस्ट २०२०, श्रावण कृ. द्वितीया शके १९४२- रघुकुलाचे कीर्तिशिखर असलेल्या प्रभू श्रीरामचन्द्रांचे भव्य मंदिराचे भूमिपूजन पंतप्रधान आदरणीय नरेन्द्र मोदी यांचे करकमलाद्वारे सव्वा बारा वाजता श्रावण महिन्यातील 'शोभनयोग' या शुभ मुहूर्तावर संपन्न झाले.

स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वोच्च मांगल्याचा क्षण तो हाच! हे राममंदिर केवळ दगडविटांचे नाही, हे मंदिर म्हणजे–

* भारतातील हिंदूंच्या अस्मितेचा महाहुंकार आहे.
* इ. स. १५२८ पासून प्रभु रामचन्द्रांच्या वाट्याला आलेला वनवास आज संपला आहे.
* भारताच्या सर्वोच्च आदर्शांचे प्रतीक आज समूर्त होत आहे.
* गेली पाचशे वर्षे राममंदिर होण्यासाठी ज्यांनी रक्त सांडले, त्याचे आज अमृत झाले आहे.
* ज्या कारसेवकांनी २-११-१९९० व ६ डिसेंबर १९९२ ला आपले प्राण अर्पण केले, त्यांच्या आत्म्यांना आज मुक्ती मिळाली आहे.
* भारतातील अगणित मंदिरे उद्ध्वस्त करून तिथे मशिदी बांधणाऱ्या बाबराच्या वंशाला आज आपण पूर्णपणे पराभूत केले आहे.
* राम काल्पनिक आणि रामायण कपोलकल्पित असा धादांत अपप्रचार करणाऱ्या तथाकथित पुरोगामी साम्यवाद्यांचा, समाजवाद्यांचा आज संपूर्ण मुखभंग झाला आहे.
* सर्वधर्मसमभावाचे खोटे झेंडे नाचवणाऱ्यांचे खोटे पुरोगामी मुखवटे आज गळून पडले आहेत.
* आज खऱ्या अर्थाने 'गर्वसे कहो हम हिंदू है' असे म्हणण्याचा मंगल क्षण प्राप्त झाला आहे.
* राममंदिर होऊ नये म्हणून ज्यांनी प्रचारमाध्यमांतून गरळ ओकले, त्यांच्या छाताडावर राममंदिराचा भगवा ध्वज डोलणार आहे.
* हिंदूंच्या एकात्मतेचे महन्मंगल समूर्त रूप आज प्रकट झाले आहे.
* ज्या साधूंनी, महंतांनी रामलल्लाला शतकानुशतके जपले, त्यांचे आत्मे भूमिपूजनाला उपस्थित राहून मगच मुक्त होतील.
* रामायण व राम खोटे म्हणून न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करणाऱ्या महाभ्रष्ट भूतपूर्व सरकारचे मुख लज्जेने आज झुकले आहे.
* भारतातील असंख्य माता, भगिनी, बांधवांनीच काय पण स्वर्गातील देवतांनीही आज रामाची आरती केली आहे.
* आज भारताची भूमी मोहरली आहे. सरयूसह सप्त नद्या, अयोध्येसह सप्तपुऱ्याही आज आनंदाने नाचत आहेत.
* रामजन्मभूमीच्या लढ्याचे खोटे श्रेय स्वत:कडे बळेबळे घेऊ पाहणाऱ्यांच्या मुखाला आज मणभर काळोखी फासली गेली आहे.
* विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्ष यांच्या अगणित कार्यकर्त्यांची हृदये राष्ट्रभक्तीने आणि रामभक्तीने उचंबळली आहेत.
* अमृताचा घनु वर्षणारा आजचा दिवस भारतासाठी साफल्याचा, धन्यतेचा, कृतार्थतेचा, सौभाग्याचा आणि मांगल्याचा आहे.
* आणि आज भारताच्या वैभवशाली उभारणीचे उत्तरदायित्वही प्रकर्षाने जाणवते आहे.
* अशा अधिष्ठानाने रामराज्य निर्मितीसाठी जनकल्याणकारी व्रतही धारण करता येते, हे आज अधोरेखित झाले आहे.

राम आणि रामायण- दोन्हीही ऐतिहासिक सत्यच!

प्रभु रामचन्द्र आमचा श्वास आहे आणि अयोध्या हृदय आहे!

* * *

# आदित्य प्रतिष्ठान, पुणे

तमसो मा ज्योतिर्गमय

आदित्य प्रतिष्ठान




## सप्रेम नमस्कार!

गेली चाळीस वर्षे गुरुदेव शंकर अभ्यंकर हे प्रवचने, व्याख्यान, कीर्तने, लेखन, टीव्हीवरील कार्यक्रम या सर्व माध्यमातून भेटत आहेत आणि भारतीय संस्कृतीचे जे आदर्श आहेत, ते त्यांच्या विद्वत्ताप्रचुर वाणीतून सांगून जनजागरण घडवत आहेत. आता एक नवीन माध्यम निवडलं आहे. ते म्हणजे यूट्युब चॅनेल! आदित्य प्रतिष्ठान या प्रतिष्ठानच्या अधिकृत चॅनेलवरुन आपण अनेक कार्यक्रम प्रसारित करत आहोत. त्याला उदंड प्रतिसाद मिळतो आहे. आपण याला अवश्य सबस्क्राईब करा. सबस्क्राईब करणे विनामूल्य आहे. आणि त्यामुळे तुम्हाला वेगवेगळे कार्यक्रम कळत राहतील, बघता येतील. तेव्हा सर्वांनी या माध्यमाचा अवश्यमेव वापर करा. धन्यवाद!

**Like, Subscribe & Share**

Aditya Pratishthan | adityapratishthan | Aditya Pratishthan | 8484921130

aditya.pratishthan25@gmail.com

## संत विद्यापीठ प्रगती क्षणचित्रे





दर्शनी भिंत





साइट ऑफिस



संरक्षक दरवाजा



'वृक्षवल्ली आम्हां सोयरे'

## संत विद्यापीठ प्रगती क्षणचित्रे



तुडुंब भरलेला तलाव



हिरवीगार वनराई

५ ऑगस्टला संत विद्यापीठ



मंदिर भूमीवर श्रीराम विटेचे पूजन



चाफा फुलला



साक्षीदार औदुंबर वृक्ष

# पुनश्च कोरोनाग्रस्तांच्या सेवेत

*प्रतिष्ठानचा कार्यकर्ता श्री. रोहित फडणीस हा गुरुदेवांच्या प्रेरणेने संघाबरोबर कोरोना पेशंटच्या सेवाकार्यात गेले दोन महिने मग्न आहे. त्याचे मनोगत आपणासाठी !*

*नमस्ते सदा वत्सले मातृभूमे ।*
*त्वया हिंदुभूमे सुखं वर्धितोऽहम् ।*




**डावीकडून पहिला रोहित फडणीस**

सस्नेह नमस्कार,

१०-१५ जुलैच्या आसपास, गरवारे कॉलेजमध्ये Covid Care Centre (CCC) सुरू होणार आहे आणि मदतीसाठी स्वयंसेवकांची नोंदणी सुरू झाली आहे, असा निरोप आला. कोरोनाचा प्रादुर्भाव बघता, अशी मदत लागू शकते याची कुणकुण आधीपासूनच होती. आलेला फॉर्म आधी भरला व नंतर घरच्यांना सांगितले. घरच्यांनी देखील लगेचच होकार दिला. तयारी सुरू झाली आणि २६ जुलै रोजी संध्याकाळी गरवारे कॉलेज मध्ये दाखल झालो.

या वेळेस आम्हाला कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांबरोबर राहून त्यांची काळजी घ्यायची होती. त्यामुळे आधीपेक्षा धोका अधिक होता. गरवारे कॉलेजच्या हॉस्टेल मध्ये साधारण २०० पर्यंत रुग्णांची राहण्याची सोय केलेली आहे. आम्ही असताना हा आकडा ८०-१०० असा असायचा.

मी २७ जुलै ते ३ ऑगस्ट या आठवड्यासाठी नोंदणी केली होती. माझ्या बॅचमध्ये एकूण १९

स्वयंसेवक होते. पैकी १ महिला व ३ मुली होत्या, २०-२२ वयोगटातल्या.

गेल्या गेल्या आम्हाला ३ शिफ्टस् मध्ये विभागण्यात आले. सकाळी ७ ते दुपारी ३, दुपारी ३ ते रात्री ११ आणि रात्री ११ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ७ अश्या ३ शिफ्टस् होत्या.

मी आणि अजून ६ स्वयंसेवक असे सकाळी ७ ते दुपारी ३ च्या शिफ्टस्‌ला होतो. रुग्णांना आयुर्वेदिक काढा देणे, त्यांना चहा-नाश्ता, जेवण, औषधे देणे, नवीन रुग्णांना भरती करुन घेणे, काहींना discharge देणे, डॉक्टरांबरोबर रुग्णांच्या खोलीत जाऊन (संपूर्ण PPE किट घालून) डॉक्टरांना मदत करणे, रुग्णांना त्यांच्या घरून आलेले सामान, डबे पोहोचवणे, पाण्याचा पंप सुरू करणे, बंद करणे, गिझर चालू करणे, बंद करणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, सॅनिटीझरची सोय करणे, सर्वांना उश्या, चादरी, वाफ घेण्यासाठी स्टीमर मिळत आहेत की नाही ते बघणे, लहान मुलांसाठी खेळण्यांची व्यवस्था करणे, जागेची स्वच्छता, कर्मचाऱ्यांकडून करून घेणे इ. अनेक प्रकारच्या कामांची जबाबदारी आमच्यावर होती.

आमची इकडे येणारी दुसरीच बॅच होती. पहिल्या ३-४ बॅचेस वर CCC ची संपूर्ण सिस्टिम लावण्याची जबाबदारी आहे. त्यानुसार या सर्व सिस्टिम पुढील CCCs मध्ये राबवल्या जाणार आहेत. म्हणून प्रत्येक गोष्टीचा बारकाईने अभ्यास करणे, आपण रुग्णांची जास्तीत जास्त काळजी कशी घेऊ शकतो, त्यांचं तेथील वास्तव्य अधिकाधिक सुखकर कसं करू शकतो याचा सतत विचार करणे हे महत्त्वाचे काम आम्ही करत होतो.

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व करत असताना स्वत:चा आणि इतर स्वयंसेवकांचा कोरोना पासून बचावदेखील करायचा होता.

**CCC म्हणजे एक प्रकारचा वॉर झोन असल्याचं वेळोवेळी जाणवत होतं. वेगळाच अनुभव होता.**

या संपूर्ण काळात, आम्हाला तेथील व्यवस्थेत असलेल्या वीणाताई, सुनीलजी, प्रसादजी, डॉ. अक्षय व डॉ. कल्याणी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यासर्वांनी आमचे खूप लाड पुरवले व आमची सर्वतोपरी काळजी घेतली.

सर्व तरुणांना, मी आमच्या टीमच्या वतीने आवाहन करतो की **सध्या असं काम करणाऱ्यांची खूप आवश्यकता आहे.** येणाऱ्या काळात कोरोना रुग्णांचा आकडा वाढणार आहे. त्यामुळे **ज्यांना शक्य आहे त्यांनी या उपक्रमात जरूर सहभागी व्हावे. संघातर्फे आपली खूप काळजी घेतली जाते.** घाबरण्याचं काही कारण नाहीये.

सध्या आम्ही पौड रोड येथील सरस्वती सदन या हॉस्टेल मध्ये रविवारपर्यंत quarantine आहोत. या दरम्यान आमची कोरोना टेस्ट होईल. ती निगेटिव्ह आली की आम्ही घरी जाऊ.

या उपक्रमामुळे बरेच नवीन मित्र मैत्रिणी मिळाल्या. बऱ्याच नवीन गोष्टी शिकता आल्या, काहीतरी खास केल्याचा आनंद मिळाला आणि महत्त्वाचे म्हणजे **कोरोनाविरुद्धच्या लढ्यात खारीचा वाटा उचलू शकलो याचं विशेष समाधान मिळालं.**

पुन्हा एकदा घरच्यांचे, विशेष करून बायकोचे जान्हवीचे आभार मानतो. त्याचबरोबर समर्थ भारत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती, सह्याद्री हॉस्पिटल व पुणे महानगर पालिका यांचे, ची कल्पना प्रत्यक्षात आणल्याबद्दल आभार मानतो.

आलेल्या संकटाचा मुकाबला करण्याची शक्ती सर्वांना मिळो, हीच रामचरणी प्रार्थना !

शनिवारी आमची टेस्ट आहे परत. गुरुदेवांचा व आपला आशीर्वाद हवा आहे.

– रोहित फडणीस
दि. ५ ऑगस्ट २०२०

* * *

ॐ



प.पू. विजयेन्द्र सरस्वती
शंकराचार्य स्वामी महाराज
(काञ्चीपीठ)

सप्त पवित्र पुरीपैकी अयोध्या आणि काञ्ची या आहेत. ५ ऑगस्टला अयोध्येत जो राममंदिर शिलान्यास करण्यात आला. तेथे काञ्चीहून आलेल्या ताम्रपटाचा निक्षेप करण्यात आला. तो ताम्रपट खालील प्रमाणे –

।।श्रीरामाय नमः।।

स्वस्तिश्री विक्रम संवत् - २०७७तमे शालिवाहनशके १९४२तमे शार्वरिनामसंवत्सरे पूर्णिमान्त मासानुसारं भाद्रपदमासे अमान्त मासानुसारं श्रावणमासे कृष्णपक्षे द्वितीयातिथौ बुधवासरे धनिष्ठानक्षत्रोपरि शततारकानक्षत्रे शोभनयोगे गरकरणे तुलालग्ने शुभमुहूर्ते शुभदिने अयोध्यायां श्रीरामजन्मभूमौ श्रीराममन्दिरनिर्माणप्रारम्भः समपत्स्यत।

॥ बलं विष्णोः प्रवर्धताम् ॥

॥ योगक्षेमो नः कल्पताम् ॥

॥ शिवो नः सुमना भव ॥

॥ सा नो देवी सुहवा शर्म यच्छतु॥

॥ सकलं भद्रमश्नुते ॥

॥ सा हि श्रीरमृता सताम् ॥

॥ रामो विग्रहवान् धर्मः ॥

॥ जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ॥

॥ वेदः प्राचेतसादासीत् साक्षाद्रामायणात्मना ॥

॥ सीतायाश्चरितं महत् ॥

॥ लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु ॥

श्रीराम जय राम

जय जय राम

॥मङ्गलम् महत्॥

5th August, 2020

## ‘हे पाठ कराच !’



## आरती

श्रीराम जय राम जय जय राम ।
आरती ओवाळू पाहू सुंदर मेघ:श्याम ।। धृ ।।

टणत्कराचे ठाण करि धनुष्यबाण ।
मारुती पुढे उभा कर जोडून ।। १ ।।

भरत शत्रुघ्न बाई चवऱ्या ढाळिती ।
सिंहासनी आरूढले जानकीपती ।। २ ।।

रत्नजडित माणिक वर्णू काय मुगुटी ।
स्वर्गातूनी देव पुष्पवृष्टी करिती ।। ३ ।।

विष्णुदास नामा म्हणे मागणे हेचि ।
अखंडित सेवा घडो रामचरणांची ।। ४ ।।